गेली सोळा वर्षे या विधानसभेचा मी सदस्य आहे. परंतु गेल्या सोळा वर्षांत मी जनतेकरता काहीही करू शकलो नाही. कारण प्रस्थापित भांडवलदारी लोकशाही ही क्रांतिकारक कार्यक्रम अंमलात आणायला निरुपयोगी आहे. म्हणून मी माझ्या सदस्यत्वाचा राजीनामा देत असून जनतेच्या ‘सशस्त्र क्रांती’ची तयारी करावयास बाहेर पडत आहे.

— टी. नागीरेड्डी

## रोखलेल्या बंदुका । उठलेली जनता



# माणूस

२ सप्टेंबर १९७०

चाळीस पैसे

बुधवार, २ सप्टेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : चौदावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार ...

□ आपल्या २२–८–७० च्या अंकात 'ठेवी का घटल्या' या वास्तविक अत्यंत चांगल्या लेखात एक अजब सूचना ग्रामीण भागातील बँकांकरता आहे. स्थानिक भाववाढ होऊन बँकेतील कर्मचाऱ्यांबद्दल लोकांत असूया निर्माण होऊ नये म्हणून वेतनश्रेणी ग्रामीण भागास योग्य अशी असावी, म्हणजेच शहरांच्या मानाने कमी असावी अशी सूचना आहे. म्हणजे खेड्यातून जाण्याचा कर्मचाऱ्यांचा आधीच उल्हास आणि त्यात कमी वेतनश्रेणीचा हा फाल्गून मास ठरायचा.

मी तर असेच म्हणेन की खेड्यातून जाण्यास तयार होण्याकरता उत्तेजन म्हणून शहरापेक्षा थोडे जास्तच वेतन द्यावे. फार तर तेथील खर्चाचे प्रमाण खूप कमी म्हणून ग्रामीण भागास योग्य अशी रोख रक्कम द्यावी व बाकीची रक्कम त्यांच्या नावे त्याच बँकेत फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवावी व ती सेवानिवृत्त होईपर्यंत उचलण्यास परवानगी देऊ नये.

या मुळे कर्मचाऱ्याचा व्याजाच्या रूपाने व बचतीच्या रूपाने फायदा होईलच, शिवाय त्यास एक प्रकारचे निवृत्ती वेतन, तेही शहरात काम करणाऱ्यांच्या मानाने जास्त मिळेल व स्थानिक लोकांत असूया निर्माण होण्याचा जो धोका लेखकास दिसतो तो राहणार नाही. वेतन प्रमाण कमी करण्याने खेड्यात काम करण्यास कोणीही पुढे येणे कठीण होईल.

२१ ऑगस्ट, १९७० — ग. म. पेंडसे, हैद्राबाद

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# यती....

# ग्रामस्वराज्यकोश

' संसार मुळींच नासका '–अरे ही मुळापासूनच नासलेली लोकशाही आहे. ऐंशी टक्के समाज जेथे गुलाम म्हणून राबत होता त्या ग्रीसमध्ये उदयास आलेली ही व्यवस्था आहे. वसाहतींच्या शोषणावर जगणाऱ्या इंग्लंड–अमेरिकेत ही वाढली. श्रीमंताघरची ही लेक. गरीब वराशी तिचे आज लग्न लागलेले आहे. इथे तिचे जमणार कसे ? ती नीट वागणार कशी ? मूळ घरी तिच्या पायाला कधी खडासुद्धा बोचला नाही. इथे, या आपल्यासारख्या गरीब देशात, पिण्याचे पाणीदेखील मैला-मैलावरून तिला वाहून आणावे लागत आहे. ती धुसफूस, आकांडतांडव करणारच. ती येथे, गरीबाघरी सुखाने नांदणार नाही. म्हणून लोकशाही धोक्यात, धोक्यात असा आक्रोश करण्यात काही अर्थ नाही. लोक रस्त्यावर आले, त्यांनी आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी कायदा हातात घेतला तर बिचकून जाण्याचेही कारण नाही. आजची लोकशाही ही सामान्यजनांना श्रीमंतांची चैन वाटू लागली आहे, तिच्या-मार्फत त्यांचे दैनंदिन प्रश्न सुटण्याची त्यांना आशा उरलेली नाही. त्यांचे प्रश्न सुटतील, सत्तेचा वा संपत्तीचा न्याय्य वाटा त्यांना उपभोगता येईल अशी व्यवस्था निर्माण करण्याची खरी गरज आहे. संसदीय लोकशाही ही जनसामान्यांची गरज पूर्ण करू शकत नाही, हा गेल्या वीस वर्षांतील इथला रोकडा अनुभव आहे. करू शकेलच कशी ? अरे, संसार मुळींच नासका–मुळातच कुजलेली, खुरटलेली, अन्याया-वर उभी राहिलेली ही शासनपद्धती, ही राज्यव्यवस्था, ही समाजरचना...असे काही तरी तो यती आपल्या धारदार आवाजात सांगत होता. सासवडच्या एका अभ्यासवर्गात. जमलेले पाचपन्नास पूर्णवेळ कार्यकर्ते प्रभावित होत होते. यतीचा डावा हात थरथरत होता. जणू पाच बोटे वातावरण सदोदित कापण्यातच गुंतलेली होती. आक्षेप, जिथल्या तिथे, तीक्ष्ण शब्दांनी उडविले जात होते. मधूनच उजवा हात समोरच्या बैठ्या मेजावर जोराने आपटला जाऊन प्रतिपादन बिनचूक असल्याची जणू ग्वाहीच फिरवीत होता.

Confrontation की Consenses असा प्रश्न होता. जमीनवाटपाचा कार्यक्रम हाती घेताना शासनाचा विरोध आला तर भूमिका घ्यायची ती समझोत्याची की विरोधाची ? सत्याग्रह वगैरे प्रतिकाराचे मार्ग चालू लोकशाही चौकटीत बसू शकतात की नाही ?

आर. के. पाटील आदि मंडळी लोकशाहीचा वारसा उधळला जाऊ नये हा पक्ष मांडणारी होती. हा वारसा जपून, जोपासून सर्वोदयाचे आंदोलन चालवले जावे असा या मंडळींचा आग्रह होता. अभ्यासवर्गासमोर प्रश्न होता, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा. गेली दहाबारा वर्षे या आदिवासींनी सरकारी जमीन कसली होती, पिके घेतली होती. सरकारने आता या जमिनी आदिवासींकडून परत काढून घेण्याचे ठरवले होते. डाव्या कम्युनिस्टांनी सरकारला आव्हान दिले होते. इतरही पक्षांनी सरकारविरोधी धोरण स्वीकारलेले होते. याप्रसंगी ठाणे जिल्ह्यातील सर्वोदयी कार्यकर्त्यांनी कोणती भूमिका घ्यायची ? वाटाघाटी, चर्चा आणि सामोपचार की सत्याग्रहदेखील ?

निर्णय अखेर सत्याग्रहाच्या बाजूने लागला. आचार्य भिसे यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह जाहीरही झाला. पण सरकारनेच माघार घेतली. मुख्यमंत्री नाईक यांनी मध्यस्थी करून प्रसंग तात्पुरता तरी टाळला. आदिवासींनी लागवडीखाली आणलेल्या जमिनी त्यांच्याकडून काढून घेतल्या जाणार नाहीत, असे सरकारी धोरण जाहीर झाले.

पण यतीच्या–शंकरराव देव यांच्या–मूळ भूमिकेचे काय ? पाश्चिमात्य संसदीय लोकशाही खरोखरच येथील मूलभूत प्रश्न सोडविण्यात अयशस्वी ठरत आहे काय ?

नक्षलवाद्यांना, उग्र डाव्या–उजव्या पंथीयांना आज असेच वाटत आहे. कोणी उघड बंडाची तयारी करतो, कोणी ठोकशाहीची भाषा उच्चारतो. पण सर्वोदयवाद्यांनाही तसेच वाटत असेल, तर त्यांना अभिप्रेत असलेली पर्यायी व्यवस्था कोणती, तिच्या उभारणीसाठी आज त्यांचेजवळ कार्यक्रम कुठला, यावरही त्यांनी स्वच्छ प्रकाश टाकला पाहिजे.

'ग्राम स्वराज्य' असे उत्तर सर्वोदयवादी देतील. त्यासाठी गावोगाव ग्रामसभा स्थापन करण्याचा कार्यक्रमही सर्वोदयी मंडळींनी हाती घेतलेला दिसतो. पण कुठेही ग्रामसभेचे स्वतंत्र अस्तित्व, वेगळेपण जाणवत नाही, ही वस्तुस्थिती आहे. क्रांतिकारक लोकशक्तीला नवा संघटीत आकार देण्याऐवजी बहुतेक ठिकाणी, कल्याणकारी राज्याचे फायदे, आजवर उपेक्षित असलेल्या समाजगटांपर्यंत पोचविण्याचे 'भले' कार्य करण्यातच सर्वोदयी कार्यकर्ते रममाण झाल्यासारखे वाटतात. या निर्माणकार्याला क्रांतिकार्य म्हणता येत नाही. ही विधायक सेवा व्यर्थ आहे असे नाही. पण संसदीय लोकशाहीला आव्हान देणाऱ्या नव्या लोकतंत्राचा मार्ग यातून निष्पन्न

होणार नाही, हेही निश्चित. ग्रामस्वराज्य कोश जमतील; ग्रामस्वराज्याची उभारणी मात्र यातून साधणार नाही.

तसे कोशही जमवायला हरकत नाही, मग क्रांतीची भाषा, यतीचा तो आवेश मात्र सोडावा लागेल. कार्यकर्त्यांच्या चरितार्थासाठी, निरनिराळ्या संस्था चालविण्यासाठी निधीची आवश्यकता ही असतेच. भिवंडीची दंगल उसळली की 'शांतिसैनिक हवेत' म्हणून टाहो फोडणारी मुंबईची बडी वृत्तपत्रे ग्रामस्वराज्यकोशाला मात्र आडवी येत असतात, हा अडाणी विनोद काही और आहे. शांतिसैनिक काय आकाशातून हवे तेव्हा कोसळत असतात, की झाडाला लागतात? सन्मानाने जगता यावे एवढी त्यांची व्यवस्था समाजाकडून झाली तरच अशा संघटना तग धरू शकतात, किमान गुणवत्तेची माणसे त्यात राहू शकतात. त्यांची गरज अडीअडचणीला भासते म्हणून त्या उपेक्षित राहता कामा नयेत. देशाचे हजारो कोटी रुपये ज्यावर वर्षाकाठी खर्च होतात ते आपले सेनादल काय नेहमी 'उपयोगा'त येत असते? तसेच सामाजिक क्षेत्रातील शांतिसेनेसारख्या संघटनांचे असते. एरव्ही हे कार्यकर्ते आपापल्या कार्यक्षेत्रात फिरत असतात. शिबिरे भरवतात. अभ्यासवर्ग चालवितात. ग्रामदान प्रचारासाठी हिंडत असतात. उत्पातप्रसंगी निरनिराळ्या ठिकाणाहून धावून येतात. सुरक्षित, चाकोरीतील जीवनाला सरावलेले कोणीही कोयना पुनर्वसनासाठी दिवस न् दिवस खर्च करू शकत नाहीत. शासनावर सर्व जबाबदारी सोपवून मोकळेही होता येत नाही. अशा वेळी ज्यांची गरज भासते त्यांना, नित्याच्या काळातही समाजाने जगवले, वाढवले पाहिजे. ग्रामस्वराज्य कोशाची यासाठी आवश्यकता आहे.

पण यतीने दाखविलेल्या ध्येयसृष्टीकडे झेप घ्यायची असेल तर मात्र कोश, फंड, पावतीपुस्तके, ग्रामपंचायतीचे-जिल्हा परिषदांचे ठराव, कामगार संघटनांची आवाहने, राष्ट्रपतींच्या आणि टाटाबिर्लांच्या देणग्या-हा सारा बडीवार व्यर्थ आहे, बरं का मित्रांनो! तो शेवटी जीवघेणा मायापाशच ठरतो. भीष्मद्रोणादिकांनाही तो तोडता आलेला नाही. मनातून सहानुभूती असली तरी पांडवांचा न्याय्य पक्ष ऐनवेळी त्यांना घेता आला नाही. नासक्या मुळीच्या फांदीवर बसून मुळीवरच घाव घालणे कधी शक्य असते का?

**श्री. ग. मा.**

# उजव्या प्रतिगामी प्रवृत्ती आणि डावा साहसवाद यांच्याशी आपण मुकाबला करणार आहोत ! !

नव-कॉंग्रेसच्या महासमितीची मध्यंतरी दिल्लीला बैठक भरलेली असताना प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी एकाच वाक्याचा वारंवार उच्चार केला होता. उजव्या प्रतिगामी प्रवृत्ती आणि डावा साहसवाद यांच्याशी आपण निर्धाराने मुकाबला करणार आहोत हे वाक्य त्यांच्या भाषणात एकसारखे येत होते.

यापैकी ' उजव्या प्रतिगामी प्रवृत्ती 'चा उल्लेख मुख्यतः जनसंघाच्या संदर्भातच केला होता. नव्या मुस्लीम लीगच्या प्रस्थापनेला तोंड भरून आशीर्वाद देणाऱ्या आणि स्वतंत्र ध्वजाची मागणी करणाऱ्या ' कळहम 'शी सहकार्य करणाऱ्या आपल्या प्रधानमंत्र्यांना उजवी प्रतिगामी प्रवृत्ती फक्त जनसंघातच आढळावी हे त्यांनी अविभक्त कॉंग्रेसच्या बंगलोर अधिवेशनापासून स्वीकारलेल्या धोरणाशी सुसंगत असले तरी त्यात केवळ सूडबुद्धीचेच राजकारण आहे असेच कोणीही म्हणेल. स्वतंत्र मतदारसंघाचा प्रच्छन्न पुरस्कार करणारी मुस्लीम लीग, शिखीस्तानचे स्वप्न पाहणारे अकाली दल आणि ' भारत हे स्वायत्त घटकांचे संघराज्य असावे ' असा आग्रह धरणारी द्रविड मुन्नेत्र कळहम यांच्या ध्येयधोरणात प्रधानमंत्र्यांना काहीही आक्षेपार्ह वाटत नाही आणि जनसंघाच्या ' भारत माता की जय 'च्या घोषणेत मात्र त्यांना जातीयवादाचा आविष्कार आढळतो; यात निःपक्षपाती निरीक्षकांना विसंवाद आढळत असला तरी सत्ताकांक्षी राज्यकर्त्यांना या विसंवादाचे भान बाळगण्याची पर्वा वाटत नाही असाच गेल्या तीन साडेतीन वर्षातील भारतीय राजकारणाचा अनुभव आढळतो.

उजव्या प्रतिगामित्वाचा इंदिरा गांधी जितक्या पोटतिडिकीने धिक्कार करतात तेवढ्याच तीव्र स्वरात त्या डाव्या साहसवादाचा निषेध करीत असल्या तरी प्रत्यक्षात मात्र या साहसवादाविरुद्ध तातडीने उपाययोजना केली जात आहे असे दिसत नाही. या डाव्या साहसवाद्यांपैकी मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या गटाशी निवडणूक-करार विषयक बोलणीदेखील केली जातात. म्हणजे मग फक्त उरतात ते नक्षलवादी. त्यांच्याशी बोलणी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण संसदीय लोकशाहीवर त्यांचा विश्वासच नाही. अशा परिस्थितीत नक्षलवाद्यांशी इंदिरा गांधी यांना खरोखरच मुकाबला करायचा असेल तर ज्या परिस्थितीतून ही वृत्ती पोसली

जाते ती परिस्थिती नाहीशी करण्याच्या दृष्टीने पावले टाकावी लागतील. परंतु प्रत्यक्षात तसे कोणतेच पाऊल पडलेले दिसत नाही.

या नक्षलवादाचा प्रादुर्भाव भारतामध्ये किती ठिकाणी झालेला आहे यासंबंधीचा एक नकाशा नुकताच वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेला आहे. त्या नकाशाकडे नजर टाकली की म्हैसूर, राजस्थान, गुजरात आणि हरियाना ही चार राज्ये सोडली तर इतर सर्व राज्यांमध्ये नक्षलवादाने पायारोवा केल्याचे दिसून येते. यापैकी पश्चिम बंगाल तर नक्षलवादाचे जन्मस्थानच आहे. त्याशिवाय आंध्रप्रदेश आणि केरळ या दोन राज्यात हा गट बऱ्याच संघटीत स्वरूपात कार्यरत झालेला आहे. पश्चिम बंगालमधून ही चळवळ बिहार आणि भारत–नेपाळसीमा येथपर्यंत पसरत गेलेली आहे. काश्मीर, पंजाब आणि हिमाचलप्रदेश या उत्तर सीमेवरील राज्यांमध्येही ही प्रवृत्ती मूळ धरू पहात आहे. म्हणजे भारताच्या पूर्व, उत्तर आणि दक्षिण या तीन सीमांवर नक्षलवाद्यांच्या हालचाली सुरू असून पश्चिम आणि मध्य भारतामध्ये अद्यापी या चळवळीला पायारोवा करता आलेला नाही.

या चळवळीचे तंत्र ठरीव आहे. खून करणे, आगी लावणे, दहशतवादाचे थैमान मांडणे आदि प्रकारांनी प्रस्थापित राज्यसत्ता उलथून लावण्याची प्रतिज्ञा करून श्री. चारु मुजुमदार आणि श्री. कनू संन्याल यांनी १९६७ मध्ये नक्षलबाडीमध्ये या अतिडाव्या साहसवादाची मुहूर्तमेढ रोवली. भारताच्या स्थैर्यावर आणि सामर्थ्यावर या चळवळीने आघात होत असल्यामुळे साहजिकच नक्षलवादी कार्यकर्त्यांना पूर्व पाकिस्तान आणि चीन यांच्यामार्फत पैसा आणि शस्त्रास्त्रे यांचा पुरवठा होऊ लागला. प्रारंभी हा गट भूमिगत वावरत होता. परंतु गेल्या वर्षीच्या मे–दिनाच्या वेळी श्री. कनू संन्याल यांनी या ' मार्क्सवादी – लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षा 'च्या स्थापनेची जाहीर घोषणा केली. तत्पूर्वी म्हणजे १९६९ च्या अखेरीला श्री. संन्याल यांना पकडण्यात येऊन हिंसाचाराबद्दल त्यांच्यावर खटलाही भरण्यात येणार होता. परंतु ज्योति बसू यांनी आपल्या गृहमंत्रिपदाच्या अखत्यारीत त्यांच्यावरील खटला मागे घेऊन त्यांची सुटका केली. परंतु त्यानंतर या ' मार्क्सवादी – लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षा 'चा ज्योति बसू यांच्या ' मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला 'ही उपद्रव जाणवू लागला. लागलीच कनू संन्याल आणि त्यांचे सहकारी भूमिगत झाले. तेंव्हापासून नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायांना जोर चढला आणि त्यांचे कार्यही पश्चिम बंगालपुरते मर्यादित न राहता आंध्रप्रदेश, केरळ आदि राज्यात पसरू लागले.

गेल्या महिन्यामध्ये अप्पाला सुरी आणि नागभूषण पटनाईक हे आंध्र प्रदेशातील नक्षलवादी कार्यकर्ते चारू मुजुमदारांशी सल्लामसलत करण्यासाठी कलकत्याला आलेले असताना त्यांना अटक करण्यात आली. चारू मुजुमदार आणि कनू संन्याल हे या चळवळीचे आद्य प्रवर्तक. परंतु आता त्या दोघात मतभेद निर्माण झालेला

पृष्ठ ६४ वर

# ध्वजांचे राजकारण

तामीळनाडूचे मुख्यमंत्री एम्. करुणानिधी यांनी आपल्या राज्यासाठी एका वेगळ्या ध्वजाची मागणी करून गेल्या पंधरवड्यात एकच खळबळ उडवून दिली. राज्यसभेत आणि लोकसभेत सदस्यांनी संताप व्यक्त केला आणि सर्व देशभरच्या वृत्तपत्रांनीही या मागणीची दखल घेऊन टीका केली. त्यांच्या या मागणीचा सरकार अभ्यास करीत आहे असे प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी सांगून सर्वांवर कडी केली.

राज्याचा वेगळा ध्वज मागण्यामागे तामीळनाडूचा हेतू काय आहे? करुणानिधी म्हणतात, राष्ट्रीय ध्वजाव्यतिरिक्त प्रत्येक राज्याचा वेगळा झेंडा असायला काहीच हरकत नाही. एरवी आपण अशोक स्तंभ राष्ट्रचिन्ह म्हणून वापरतो. त्याशिवाय प्रत्येक राज्यांचे स्वतंत्र चिन्ह असतेच की. तसाच वेगळा ध्वज. त्याने देशाच्या एकतेला बाध येण्याऐवजी ती अधिक दृढ होईल असे त्यांचे म्हणणे. पश्चिम जर्मनीत अशी प्रथा आहेच.

करुणानिधींनी आपल्या ध्वजाचे डिझाईन सर्व मुख्यमंत्र्यांना पाठविण्याचे ठरविले आहे. त्यांची सूचना स्वीकारली गेली तर मोठी गंमत होईल. राज्यांचे मुख्यमंत्री एकत्र जमतील तेव्हा त्यांच्या मागे त्यांच्या राज्याचे रंगीबेरंगी ध्वज दिसतील. राज्याचा मान वाढेल. स्वायत्ततेलाही अधिक बळकटी येईल.

पण ही कल्पना करुणानिधींना आत्ताच एकाएकी का सुचली? त्यालाही काही कारणे आहेत. द्रविड मुन्नेत्र कळहममध्ये सध्या गटबाजी सुरू झाली आहे. भारतापासून फुटून निघण्याची भाषा द्र. मु. क. चे लोक पूर्वी करीत होते. आता त्यांनी ती भाषा सोडली आहे. पण पक्षातील जहाल गट अजून थंडावलेले नाहीत. त्यांना शांत करण्यासाठीच करुणानिधींनी वेगळ्या ध्वजाची कल्पना काढली म्हणतात.

इंदिराबाईंनी तरी या मागणीला तावडतोब का धुडकावून लावले नाही? आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी संदिग्ध उत्तर दिले. एकदम नाही सांगितले नाही. याला दोन कारणे असू शकतात. एक म्हणजे बाईंना करुणानिधींच्या मागणीमध्ये काहीतरी तथ्य वाटत असले पाहिजे. आणि दुसरे म्हणजे द्र. मु. क. ची ताकद. इंदिरा गांधी प्रधानमंत्रिपदाच्या खुर्चीवर आहेत त्या कम्युनिस्ट आणि द्र. मु. क. च्या खासदारांच्या आधारावर. द्र. मु. क. ला एकदम दुखवून त्यांना चालणार नाही. म्हणून बाईंचा संदिग्ध पवित्रा.

द्र. मु. क. मधील अंतर्गत कलह नुकतेच दुसऱ्या एका निमित्तानेही उघडकीला आले आहेत. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये सबंध तामीळनाडूमध्ये स्वैर

विजय मिळविणाऱ्या या पक्षाला नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये बऱ्याच ठिकाणी मार खावा लागला. काही ठिकाणी तर पक्षाच्या जुन्या कार्यकर्त्यांनीच पक्षाच्या उमेदवारांविरुद्ध बंडाचे झेंडे उभारले. बेशिस्तीचे विष पक्षभर कालविले गेले. या बंडामागे आपल्या काही मंत्र्यांचा हात असावा असा मुख्यमंत्री करुणानिधींना संशय होता. त्यांनी एक आता नवी 'कामराज योजना' आणली आहे. आणि पक्षाच्या पुनस्संघटनेसाठी आपल्या बऱ्याच मंत्र्यांना ते मुक्त करणार आहेत.

आतापर्यंत एखाद्या घट्ट पाषाणाप्रमाणे समजल्या जाणाऱ्या या पक्षातही आता तडे जाऊ लागलेले पाहून अनेक पक्षांना हर्षवायू होऊ लागला आहे. आतापर्यंतच्या योजनेप्रमाणे स्वतंत्र पक्षाचे आमदार द्र. मु. क. सरकारवर टीका करीत नव्हते. आता त्यांना याबाबतीत मोकळे सोडण्यात आले आहे.

परंतु द्र. मु. क. च्या अंतर्गत कलहावर एवढ्यातच हुरळून जाण्याचे कारण नाही. आपल्या घरातील भांडणे बाजूला ठेवून हा पक्ष प्रथमच केरळातील निवडणुकीच्या आखाड्यात कंबर कसून उतरला आहे. निवडणुकीचो शिंगे जोराने वाजू लागली आहेत. आणि सतरा सप्टेंबरपर्यंत साऱ्या देशाचे लक्ष केरळकडे वळणार आहे. कारण केरळच्या आरशात १९७२ च्या सार्वत्रिक निवडणुकांचे भविष्य दिसणार आहे.

या भयाण भविष्याची चिन्हे आतापासूनच दिसू लागली आहेत. केरळात पक्षोपपक्षांनी अनेक आघाड्या उभारल्या आहेत. पण त्या केवळ कागदावर. ठिकठिकाणी या आघाड्या कोलमडून पडताहेत. अनेक मतदार संघात एकाच आघाडीतील घटक पक्षाचे उमेदवार परस्परांविरुद्ध उभे ठाकले आहेत. एवढेच नव्हे तर एकाच पक्षातले उमेदवारही शिस्तीची सगळी बंधने झुगारून आपल्या सद्सद्विवेक बुद्धीच्या आवाहनावर आपल्याच पक्षबंधूविरुद्ध उभे आहेत. नव्या काँग्रेसमध्ये हे दृश्य अधिक दिसते. ते त्या पक्षाच्या परंपरेला शोभणारेच आहे. उजवे कम्युनिस्ट आणि नवी काँग्रेस यांच्यातील युती अनेकांना पसंत नाही. त्यामुळे कितीतरी कार्यकर्ते आपापल्या पक्षाचे राजीनामे देत आहेत. आतापर्यंतच्या केरळातल्या निवडणुकांमध्ये एवढा गोंधळ कधीच माजला नव्हता.

या निवडणुकीमध्ये केरळात कोणते बाळ जन्माला येणार आहे? आणि ७२ मध्ये अवघ्या देशात काय होणार आहे?

केरळानंतर कदाचित बंगालच्या निवडणुका येतील. या दोन निवडणुकांमध्ये साऱ्या देशाचा मूड नक्की कळावा. कलकत्त्यात मागच्या आठवड्यात बॉम्ब् तयार करण्याच्या द्रव्याचा प्रचंड साठा पोलिसांनी जप्त केला. कनू संन्यालला पकडले. पण बॉंब स्फोट अद्याप चालूच आहेत. सरकारी नोकरांचा संप, मार्क्सिस्टांची निदर्शने, बंद, घेराव यांनी बंगालला ग्रासून टाकले आहे. आणि अशाही स्थितीत बंगालात निवडणुका घेण्यास काहीच हरकत नाही असे बंगाली म्हणताहेत. आनंद आहे.

**– अरुण गोसावी**

सांस्कृतिक मुंबई

रविंद्र पिंगे


# प्रकाशन सोहळे

## लोकसत्ताकार ह. रा. महाजनी – स्मृति

गेल्या आठवड्यात मुसळधार पावसाने शहर मुंबईत जो चक्ताल धरला होता, त्याला सुमारच नव्हता. खरं तर श्रावणात होणारी ऊन-पावसाची उघडझाप पाहून डोळे निवले पाहिजेत. श्रावणमास म्हणजे ऋतुचक्राचं सुखद सोनशेंदरी पान. आषाढातल्या चिंब बरसातीचं पाणी पिऊन तृप्त झालेल्या वृक्षांच्या अंगावरल्या नव्या पानपाणोऱ्याची शोभा श्रावणातल्या ओल्या उन्हात पुन्हा पुन्हा पाहायची. प्रत्यक्षात मुंबईकरांच्या वाट्याला आला तो मात्र धबधब्यासारखा दाही दिशांतून कोसळणारा, दिशा कुंदकाळचा करणारा, ओक्साबोक्शी थैमान घालणारा सहस्र-धारारूपी पर्जन्य ! पावसाच्या ह्या अनाकलनीय प्रीतिवर्षावामुळे पाय लटपटले सांस्कृतिक क्षेत्रातल्या कार्यकर्त्यांचे आणि उमेद पार कोमेजली कलावंतांची. कारण कार्यक्रम करायचा तरी कुणाचा आणि केलाच, तर त्याला हजेरी तरी लावणार कोण ? काळोखात पारवे झाडावर चिडीचूप बसतात, तसे मुंबईकर गेल्या पर्जन्यसप्ताहात पावसाच्या नावाने चडफडत घरोघर गप्प बसले.

त्यातल्या त्यात कै. ह. रा. महाजनींचं नशिब, मरणोत्तर का होईना, पण त्या तशा पावसाळी काळोखातही झळाळून गेलं. पावसाच्या तुफान माऱ्यापुढे निश्चित पराभव खाणार असं वाटलेला 'लोकसत्ताकार ह. रा. महाजनी – स्मृति' ह्या ग्रंथाचा प्रकाशन सोहोळा ठरल्याप्रमाणे आजी आणि माजी थोरामोठ्यांच्या उप-स्थितीत व्यवस्थित पार पडला. कै. महाजनींच्या प्रथम स्मृतिदिनाचा योग साधून हा स्मारकग्रंथ आराधना प्रकाशनातर्फे अठरा ऑगस्टला प्रसिद्ध झाला. श्राद्धदिन ही वेळ गुणसंकीर्तनाची. ते पथ्यपाणी सर्वांनी पाळले. महाजनी म्हटले तर यशस्वी,

पृष्ठ ६२ वर



# कनू संन्याल

चारू मुझुमदारचा उजवा हात
कनू संन्याल
१९ ऑगस्टला पहाटे
सिघिजोरो येथील चहाच्या
मळ्यात पकडला गेला ? ?

शिंपी काम करणारा माणूस एकदम अतिडावा पुढारी होणं थोडं अस्वाभाविक वाटतं खरं, पण केवळ ठाम निष्ठा व धैर्य या जोरावर ते घडलं आहे--हे घडलंय ते कनू संन्याल या नक्षलवादी नेत्याच्या बाबतीत. सदुसष्ट सालच्या पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यातील नक्षलबारी उठावानंतर तो एकदम प्रसिद्ध पुरुष झाला आणि त्याने नव्या साम्यवादी (मार्क्सवादी–लेनिनवादी) पक्षाची स्थापना करून स्वतःची अशी एक प्रतिमाही उभी केली. एवढंच नव्हे तर एका वर्षाच्या आत त्याने हा दहशतवादी पक्ष उभा केला व चांगलाच सुसंघटीतही केला.

सडपातळ बांधा व सौम्य चेहरा त्याच्या वयाची वा त्याच्या ज्वलन्त व्यक्तिमत्त्वाची जरासुद्धा कल्पना येऊ देत नाहीत, मात्र बालवयापासूनच साहसवाद हा त्याच्या नसानसातून भरलेला आहे.

कनूशी बोलताना हा माणूस अतिजहाल असावा असा चुकूनसुद्धा संशय आपल्या मनाला शिवायचा नाही किंवा त्याच्या संघटनाकौशल्याची पुसटशी कल्पनाही यायची नाही. पण १९ ऑगस्टच्या पहाटे दार्जिलिंग जिल्ह्यातील सिघिजोरा येथील चहाच्या मळ्यात एका झोपडीबाहेर तो झोपला असताना (त्याच्या २९ सहकाऱ्यांसह, ज्यात कदम मलिक व त्याचा भाऊ खोदान अशा नक्षलवादी पक्षाच्या दोन अत्यंत महत्त्वाच्या कार्यकर्त्यांचाही समावेश आहे) अटक झाल्याने त्या पक्षाला जबरदस्त तडाखा बसला आहे. पक्षाचा अध्यक्ष चारू मुझुमदार हा त्याच्या अत्यंत बद्धमूल अशा छातीतील दुखण्यानें अजारी असतो. त्यामुळे त्यांचा पक्ष हा जवळजवळ नेता नसल्यासारखा झाला आहे. त्यातच आंध्र

प्रदेश व महाराष्ट्र येथील नक्षलवाद्यांचा त्या त्या राज्य सरकारांनी कठोरपणे बंदोबस्त केला आहे. गेल्या महिनाभरात बंगालमध्ये नक्षलवाद्यांच्या एम्. अप्पलासुरी व नागभूषण पटनाईक या आंध्रच्या दोन बड्या नेत्यांनाही अटक झालेली आहे. शिवाय नक्षलवाद्यांच्या नेतृत्वात कार्यक्रमाबाबतही दुमत असल्याचे अनुमान असून पक्षाचे मुखपत्र 'लिबरेशन'मध्ये येणाऱ्या लिखाणावरूनही असा अंदाज बांधता येतो. अशा या पार्श्वभूमीवर संन्यालची अटक पक्षाच्या कार्यक्रमाला काही काळ तरी खीळ घालणारी ठरेल यात काही शंकाच नाही.

असा हा नक्षलवादी पक्षाचा बडा पुढारी हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या शिलिगुरी येथील एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मला. घराण्याची परंपरा या बाळानेही पुढे चालवावी अशी बिचाऱ्या आई-वडिलांची प्रामाणिक इच्छा.

बालपणापासून हूड असलेला कनू कुरसन येथे मॅट्रिक झाला आणि त्याने जलपायगुरी येथील आनंदचन्द्र विश्वविद्यालयात प्रवेश केला. पण पश्चिम बंगालचे भूतपूर्व मुख्यमंत्री कै. बी. सी. रॉय यांच्याविरुद्ध झालेल्या हिंसक निदर्शनात प्रामुख्याने भाग घेतल्याबद्दल याला कॉलेजातून हाकलण्यात आले.

दुसरा काही उद्योग नसलेल्या संन्यालने साम्यवाद्यांशी संबंध प्रस्थापित केले व चारू मुझुमदार यांच्या हाताखाली मार्क्सवादाचे धडे गिरविले. काही काळ भरकटलेल्या अवस्थेत काढल्यानंतर त्याने शिपी कामाला सुरुवात केली. पण कालांतराने घराबाहेर पडून नक्षलवादी पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या हातिपिशा येथील शेतकऱ्यांमध्ये तो कार्य करू लागला. (हाच भाग पुढे शेतकरी उठावाचा बालेकिल्ला झाला.)

चीनमधील क्रान्तीने प्रभावित होऊन त्याने पन्नास साली साम्यवादी पक्षात प्रवेश केला. (पुढे पक्षात दुफळी माजल्यावर त्याने पेकींगकडे कल असलेल्या मार्क्सवादी–साम्यवादी पक्षात रहायचं ठरविलं.)

त्याच्या ४५ वर्षांच्या आयुष्यातील तब्बल २० वर्षे त्यानें आदिवासी शेतकऱ्यांत घालविली.

आदिवासी भागातील पक्षाचा तो मुख्य प्रचारक होता आणि त्यांच्या सवयी, चालीरीती एवढेच नव्हे तर त्यांच्या बोलीभाषाही त्याला चांगल्याच अवगत असल्याने प्रस्थापित जोतेदारी पद्धतीविरुद्ध उठावाची दीक्षा तो आदिवासींना देऊ शकला. माओ–तत्त्वज्ञानाच्या आधारावर ६७ साली त्याने नक्षालबारी येथे उठाव केल्यामुळे मार्क्सवादी–साम्यवादी पक्षाने त्याची पक्षातून हकालपट्टी केली. (नक्षलबारी उठावात भाग घेतलेल्या चारही प्रमुख नेत्यांची नावे क या बाराखडीतील होती. कनू, कदम, कामाक्ष व कोकान.)

नक्षालबारी येथील उठावामुळे अटकेसाठी पोलीस त्याच्या मागावर होते पण प्रत्येक वेळी तो पोलिसांना झुकांडी देत असे. जवळजवळ १८ महिन्यानंतर

पोलिसांना त्याला पकडण्यात यश मिळाले व ३१ ऑक्टोबर १९६८ रोजी त्याला अटक करण्यात आली. पण दुसऱ्या संयुक्त आघाडी सरकारने त्याची ८ एप्रिल १९६९ रोजी सुटका केली. आघाडी सरकारने सुटका करताच चिनी अधिकाऱ्यांशी खलबते करण्याकरिता गुप्तपणे तो तिबेटमध्ये गेला आणि तेथून परत येताच पक्ष बांधणीसाठी आसाम व त्रिपुरा राज्यांचा त्याने दौरा केला. त्रिपुरा येथील त्याच्या दौऱ्याचा परिणाम या केंद्रशासित प्रदेशात अनेक हिंसात्मक प्रकार घडण्यात झाला.

तुरुंगात असताना त्याने पुढील कार्यक्रमाच्या योजना आखलेल्या होत्याच व त्या पार पाडण्यासाठी सुटकेनंतर तात्काळ तो भूमिगत झाला. त्यानंतर थोड्याच कालावधीत 'क्रान्तिकारी साम्यवाद्यां'चा नवा पक्ष स्थापन करण्याविषयी त्याने चारू मुझुमदारचे मन वळविले आणि ६९ सालच्या मे दिनाच्या दिवशी कलकत्ता मैदान येथे त्यानेच नवा पक्ष स्थापन झाल्याची घोषणा केली. सभेनंतर मात्र त्याचे सार्वजनिकरीत्या दर्शन झाले नाही.

सिलगुरीच्या जंगलात स्वतःच्या अधिपत्याखाली गनिमी युद्धाचा तळ तयार करण्याचाही त्याने प्रयत्न केला.

पोलीस सारखे त्याच्या मागावर होतेच पण त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरत होते. दर वेळी त्यांच्या पदरी निराशा येई व कनू त्यांना हुलकावणी देऊन पळ काढीत असे. शेवटी परवा एकदाची त्याला अटक झाली. अटकेच्या वेळी काही शस्त्रे, दारूगोळा व साहित्य पोलिसांच्या हाती लागले. मिळालेल्या साहित्यावरून उठावाच्या काही योजना शिजत असल्याचा पुरावाही पोलिसांच्या हाती आला आहे.

गेली दोन दशके ज्या भागात त्याने कार्य केले त्याच भागात त्याला ६८ साली व यावेळीही अटक झाली हे मोठे अर्थपूर्ण आहे. त्याच्या अटकेचे पक्षावर काय परिणाम होतील ते कालांतराने दिसेलच; पण सध्या तरी संन्यालने आखलेल्या कार्यक्रमात खंड पडणार हे निश्चितच.

— वार्ताहर



डॉ. श्रीपाद परुळेकर

मुक्काम : लोंढा, बेळगाव

# सीमा प्रश्नाचे होणार तरी काय ?

सीमा प्रश्नाबद्दल कधी नव्हते इतके राजकारण दिल्ली व मुंबईहून होत आहे व अशा वेळी पुन्हा एकदा आमचा आवाज मुंबई येथे उठवावा म्हणून चालू महिन्याच्या २४ तारखेला मोर्चाचा कार्यक्रम आखला होता. सीमा भागात जोरदार पाऊस पडत आहे. खानापूरच्या पश्चिम भागात तर दिवसाला तो दोन तीन इंच पडत आहे. तरीसुद्धा खेड्यापाड्यात या मोर्चाबद्दल लोकात उत्साह दिसून आला. आमदार सरदेसाई, आमदार नंदीहळ्ळी यांनी खेडेन् खेडे गाठले. त्यालाही साथ मिळाली. हे होईपर्यंत श्री. बा. र. सुखटणकर, आमदार श्री. सायनाक, व सीमा भागातले झुंझार पत्रकार श्री. बाबुराव ठाकूर, श्री. कुद्रे, श्री. जुवेकर यांनी कऱ्हाड गाठले. साहेबांचा मुक्काम तिथे होता. श्री. चव्हाणांनी दिल्लीचे हवामान सांगितले. ते ऐकून हे म. ए. समितीचे पाच पांडव मुंबईस गेले. श्री. वसंतराव नाईक यांना भेटले. त्यांच्या सहकाऱ्यांना भेटले. विरोधी पक्षातील प्रत्येक आमदाराला ते भेटले. वेळ महत्वाची होती. श्री. वीरेंद्र पाटील दिल्लीत होते. तेव्हा विरोधी पक्षाने मोर्चाची वाट पहात बसणे चुकले असते, तेव्हा कृती हवी होती. ह्या पाच लोकांनी आपले काम चोख केले. विरोधी पक्षांनी खरे काय पाहिजे ते ओळखले. आणि वसंतराव नाईकांना २४ पर्यंत थांबावे लागले नाही. आणि विधान सभा चालविणे कठीण झाले ' निर्णायक कृती करणार नसाल तर शुक्रवार नंतरही आम्ही विधानसभा बंद पाडू ' असे विरोधी नेत्यांनी आवाजात ठणकावून सांगितले. आणि तो शुक्रवार म्हणजे ता. २१ उघडली. वसंतराव काय सांगणार म्हणून विधानसभेचे विरोधी पक्षाचे आमदार जमले तर आम्ही रेडीओंकडे दुपारच्या प्रादेशिक बातम्या ऐकण्यासाठी बसलो. वसंतरावांनी काय सांगितले तर आजपर्यंत वृत्तसंस्था जे सांगत तेच सांगितले आणि तेही केळकरांच्या जर तरच्या भाषेत.

ह्या सर्वांचा व्हेटो वीरेंद्राचे हातात असणे हे पालुपद होतेच. श्री. वसंतराव इतके सांगून थांबले नाहीत, ते म्हणाले, 'सद्य:परिस्थितीत केंद्र सरकार या प्रश्नावर थंड आहे असे आपणास वाटत नाही. महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी शक्य ते सर्व करीत आहे' अशी मखलाशी करून 'तेव्हा केंद्र सरकारवर 'दडपण' आणण्याची जरूरी नाही.' असे ठामपणे सांगितले. पण इतक्यात समाधान न होऊन ते पुढे म्हणाले, 'दडपणाचा पवित्रा घेतल्यास निष्कारण सोडवणुकीस अडथळे मात्र निर्माण होतील.

## वीरेंद्राचा मुत्सद्दीपणा

आम्ही डोक्यावर हात मारून घेतला. दुसरे काय करणार? तिकडे वीरेंद्राने स्पष्ट सांगितले, 'महाजन अहवाला'शिवाय दुसरे काही न करण्याची म्हैसूर विधानसभेने आपणास सांगितले आहे.' यात मोठा मुत्सद्दीपणा आहे. श्रीमती गांधींचे काही ऐकावयाचे नाही, आणि जर वरून वजनच आले तर 'तुमची योजना ह्या मी विधानसभेसमोर मांडतो' हे सांगण्याची मोकळीक त्यात होती.

श्री. वसंतरावांचे ते भाषण काही बालवाडीत नव्हते. विधानसभेतील विरोधी पक्षीय आमदारांनी त्यांना धारेवर धरून सीमा प्रश्न सुटेपर्यंत विधानसभा चालू देणार नाही असा निर्धार व्यक्त केला आणि परिणामी २७ ऑगस्टपर्यंत विधानसभा तहकूब केल्याचे जाहीर केले. आमचा मोर्चा ता. २५ ऑगस्ट रोजी होता. अर्थात तो बारगळला, पण तो खऱ्या अर्थाने सार्थकीच लागला. कारण विरोधी पक्षीय आमदारांनी विनंती केल्यावरून आम्ही तो बंद केला. आता नैतिक जबाबदारी त्यांची आहे. मोर्चा नेऊनसुद्धा आम्हाला हेच काम करावयाचे होते. ते आमच्या पंचकडीने सुंदररीत्या केले.

आता श्रीमती इंदिरा गांधींची मूठ उघडी झाली. ती सव्वा लाखाची नाही तर पुन्हा वाटाघाटीचा घोळ घालणारी. आमची अपेक्षा चंदीगडप्रमाणे काहीतरी निर्णयाची होती. पण त्या म्हैसूर राज्यातील इंडिकेटवाले दुखावले जाऊ नयेत. दुसरा मार्ग योजणार अर्थात तो कालाहरणाचा हे उघड झालेच. आमचा प्रश्न जर १९७० पूर्वी सुटला नाही तर तो सुटणे फार अशक्य आहे.

जर नवीन त्रिसदस्य मंडळापुढे खेडे हे घटक, भौगोलिक सलगता अशी तत्त्वे ठेवली नाही तर तिघेही तीन अहवाल लिहितील. महाराष्ट्राचे प्रतिनिधी पाटसकर-भटच्या प्रमाणे लिहितील तर म्हैसूरवाला 'मळीमठं वाक्यं प्रमाणम्' म्हणेल व तिसरा–ते काळाच्या उदरात आहे. पण ते आम्हास उपकारक होईलच याची ग्वाही काय? आणि शेवटी हे तीन त्रिकूट महा बिकट होऊन बसायचे. महाजन अहवालाचे वेळी आम्ही असेच म्हटले होते. तत्त्वे ठरवावयाच्या अगोदर कमीशन नेमताच का? पण आमचे कोण ऐकतो? आम्हाला मात्र देवाचे पुढे बकरी मारतात त्याप्रमाणे खाली मान घालून साक्ष द्यावी लागली. न्यायमूर्तींनी तोऱ्यात

आमच्या साक्षी नोंदवल्या व निकाल दिला. मात्र लुच्च्या कोल्ह्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार आताही अशाच नव्या खोंड्यातच आम्हाला अडकवणार काय ?

## कुठल्या जनमताचा कौल ?

दुसरा पर्याय जनमत कौलाचा. आम्ही म्हैसूर राज्यात जाऊन झाली चौदा वर्षे. या चौदा वर्षात म्हैसूरचे शासन झाल्यामुळे जे लोक आले तेही आमचे बरोबर मतदान करणार, मुसलमान तर आताच महाराष्ट्रातली भिवंडी-जळगाव सांगतात. उडप्यांना शिवसेना, याप्रमाणे प्रचाराचा धूमधडाका आहे. तेव्हा तो जनमत कौलाचा दिवस उजाडला तर काय होईल ते एक देवच जाणे !

आज असा निकाल सीमा भागाला हवा की त्यामुळे निकाल एकदाच व्हावा. कालहरण नसावे, व राजकारणच तर नसावेच नसावे.

शिवसेना व शेतकरी कामकरी पार्टी सोडल्यास सर्व पक्ष या प्रश्नाबाबत प्रादेशिक आहेत. वरच्या दोघांना इतर प्रदेशात स्थान नसल्यामुळे मनात आणल्यास तेच काही करू शकतात. शिवसेनेने सीमा भागासाठी भरपूर केले. हे सीमा भाग विसरू शकत नाही. हा सर्व झाला इतिहास. आता प्रश्न आहे उद्याचा. तो कसा सुटणार यावरच आमचा प्रश्न अवलंबून आहे. आम्हाला तीन त्रिकुटात अडकवणार की बाहेरून आलेल्या लोकांचा "ओपिनियन" पोल घेऊन आमचा प्रश्न सोडवणार ?

आमचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्राने अजूनही थोडासुद्धा मुत्सद्दीपणा दाखविला नाही. आता थोडीतरी मुत्सद्देगिरी दाखवावी.

◻ ◻ ◻

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

# कात्रणे । कात्रणे

## कात्रज घाटातील 'नक्षलवादी' बैल !

नक्षलवादी म्हणजे काय, हे आम्हाला नीटसे कळले नाही. यामुळे यासंबंधी सर्व माहिती आम्ही काळजीपूर्वक वाचतो. एका सुप्रसिद्ध दैनिकात—'कात्रजचे नक्षलवादी' या शीर्षकाखाली एका वाचकाचे आलेले पत्र असे आहे—

'आज कात्रज गावात दादागिरी बिनधोक चालू आहे. यांचा उद्योग काय, तर दिवसा देवळात जुगारी अड्डा चालतो, मुलीबाळी धुवायला किंवा बसने शाळेला बाहेर पडल्या की तेथे उभे राहून अचकट विचकट बोलायचे—पण बोलणार कोण ? गावात पोलीस आहेत तरी चोऱ्या होतात, पण गरिबांची दाद कोण घेतो ! थोडक्यात येथे नक्षलवादी गट निर्माण झाला आहे. त्याला वेळीच पायबंद घालायला हवा.'

या पत्रात वर्णन केलेले नक्षलवादी असतील, तर महाराष्ट्रात यांची संख्या सर्व तुरुंग भरून जातील एवढी तरी आहे नाही का ? कात्रजच्या या रहिवाशाच्या दुःखात सर्व भारतवर्षच सहभागी आहे. हे पत्र वाचून आम्ही निर्धास्त झालों. कारण गावातील तालिमबाज मंडळींनी, या अशा नक्षलवाद्यांच्या प्रत्येकी चार कानफटात मारल्या किंवा पृष्ठभागी चार लाथा हाणल्या व पोलीस मंडळी जरा सुधारली तर या लोकांचा बंदोबस्त मुळीच कठीण नाही. आम्ही यामुळे चांगले सुखात होतों तोच आणखी काही मजकूर एका साप्ताहिकात वाचला. शीर्षक आहे—'A Naxalite who died.' पोलीस कारवाईत मारल्या गेलेल्या एका नक्षलवादी तरुणाच्या बापाचे ते पत्र होते; आम्ही वाचू लागलो—

'आपल्या पोटच्या मुलाच्या निधनानंतर, त्याच्या आठवणी सांगायचा भयंकर प्रसंग कुणाही बापावर कधी येऊ नये—

'आमचे वडिलोपार्जित घर होते पूर्व बंगालात. फरीदपूर जिल्ह्यातील तांग्रा खेड्यात आम्ही रहात होतो. १९४५ च्या मध्याला, प्रत्यक्ष फाळणी होण्यापूर्वीच, पोटाच्या उद्योगासाठी मी कलकत्त्याला आलो. कुटुंबात आम्ही मी, माझी वृद्ध आई, पत्नी व धाकटा भाऊ अशी होतो. कलकत्त्याला मला कामधंदा लागला. याच सुमारास मला पहिली मुलगी झाली व पुढे २० डिसेंबर १९४९ या दिवशी सुदेव या माझ्या मुलाचा जन्म झाला.

'आमचे घराणे शास्त्रीपंडितांचे. माझ्या वडिलांची पूर्व पाकिस्तानात असताना संस्कृत पाठशाळा होती. मी प्रथम संस्कृतच शिकलो. पुढे मी इंग्रजी शिकलो व आता कारकुनी पत्करली होती. मला वाटे माझ्या मुलाने पुन्हा संस्कृत अध्ययनाकडे वळावे.

'सुदेव लहानपणापासून मोठा पाणीदार मुलगा होता. तो पाठशाळेत मात्र गेलाच नाही. 'श्रीरामकृष्ण विद्याश्रम' या शाळेत तो जाऊ लागला. १९६६ साली तो 'सेकंडरी' परीक्षा पास झाला–दुसऱ्या श्रेणीत.

'शाळेत तो विशष चमकला नाही, कारण आठव्या यत्तेपासून तो चळवळीत भाग घेऊ लागला. शाळा संपल्यावर 'कलकत्ता संस्कृत कॉलेज' मध्ये इंग्लीश ऑनर्स घेऊन तो बी. ए. करू लागला. त्याला अर्धनादारी व सरकारची कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळू लागली.

'पण सुदेव अभ्यास करीत नसे. राजकीय चळवळीत तो प्रामुख्याने भाग घेऊ लागल्याने त्याच्या अभ्यासावर परिणाम होत होता. मी त्याला सांगे–'तू प्रथम एम्. ए. हो–मग काय करायचे ते कर.' परंतु तो म्हणाला–या बोलण्यात काही अर्थ नाही. काळ असा कुणाकरता थांबत नाही. अखेर बी. ए. च्या अखेरच्या परीक्षा न देता त्याने कॉलेज सोडले. घरही सोडले. मे १९६९ मध्ये तो घर सोडून, पक्षाचे काम करण्याकरता खेड्यात निघून गेला. शेतकऱ्यात काम करण्यासाठी तो गेला व तेच काम करताना एका जोतेदाराला ठार मारून परतत असताना, तो मृत्युमुखी पडला.

'घर सोडल्यापासून १३ महिने तो वनवासात होता. सुरुवातीला त्याची एखाद दोन पत्रे येत. पत्रावरील पोस्टाच्या शिक्यावरून त्याला त्याच्या पक्षाने–पक्षकार्य करण्यासाठी मिदनापूर जिल्ह्यातील गोपीवल्लभपूर या भागात पाठवला आहे हे समजत होते. मध्ये एक दोनदा तो घरी आला होता. तो ज्या मार्गाने निघाला आहे तो मला पसंत नव्हता. मी त्याला बोललो, परंतु यामुळे तो संतापला. तो फक्त आईजवळ, काकूजवळ किंवा मित्रांजवळच काय तो मनापासून बोलत असे.

'सुदेवच्या स्वभावाविषयी काही सांगितले पाहिजे. तो प्रत्येक गोष्ट स्वतःच्या बुद्धीच्या निकषावर घासून पारखून पत्करत असे. आंधळेपणाने कुणाच्या मागे जाणे त्याला शक्य नव्हते. त्याच्यावर रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांच्या शिकवणुकीचा जबर परिणाम होता. अगदी अखेरच्या क्षणापर्यंत या दोघांच्या शिकवणुकीचा परिणाम शिल्लकच होता असे मला वाटते.

'याशिवाय नेताजी सुभाषचंद्र बोस, नझिरुल इस्लाम, कवि सुकांत भट्टाचार्य यांचाही कमी अधिक प्रमाणात त्याच्यावर परिणाम झालेला होता. मानवेन्द्रनाथ रॉय यांचे चरित्र तो वाचत होता हे मी पाहिलेले आहे. परदेशी नेत्यांपैकी त्याच्यावर कुणी परिणाम केला होता किंवा नाही याची माहिती मला नाही.

शेतकऱ्यात तो संपूर्णपणे मिसळला होता. त्यांची मने त्याने जिंकली होती. तो उत्कृष्ट भाषणे करी. अवघ्या २० वर्षं ६ महिने आणि १० दिवसांच्या आयुष्यात हा वर्षभराचा काळ – जणू शेतकरी म्हणून त्याचा पुनर्जन्म व्हावा असा गेला. आश्चर्य म्हणजे आपण फार दिवस जगणार नाही हे त्याला कळलेले होते. काहीतरी असाधारण करून आपण मरून जाऊ असे तो आईला व आजीला नेहमी सांगत असे. 'रामकृष्ण कथामृत' या पुस्तकात त्याने वाचले होते की हरिनाम

मुखात ठेवले तर लैंगिक वासना गळून जातात. तेव्हापासून त्याच्या तोंडात 'हरिनाम' आलेले होते. त्यानें लिहिलेले एक पत्र पुढे देतो–

मां, बूदिदी, काकिमां, दिदी–

"मी ठीक आहे. माझी काळजी करू नका. काळजी करून काहीच उपयोग नसतो. काळजी टाळण्याचा एक उपाय म्हणजे फक्त माझ्या एकटयाचा विचार न करता ज्या गरीबगुरिबांनी माणूस म्हणून जगण्यासाठी हातात शस्त्र घेतले आहे, त्यांचा विचार मनात आणा. माझ्यासारखे अनेक तरुण त्यांच्याबरोबर वाटचालीला निघाले आहेत. त्या सर्वांतील मी केवळ एक आहे, असे मनात आणलेत तर तुमचा प्रश्न सुटेल.

"आता कुठे लढा सुरू होत आहे. सर्व कृष्णवर्णीय गरीब आणि भित्री माणसे, जी आतापर्यंत फक्त घाम गाळीत होती आणि ज्यांना माणूस म्हणूनही कुणी समजत नव्हते, अशी माणसे नवे जग घडवण्यासाठी उठली आहेत. या भूमीतील भुकेकंगाल लढू लागले आहेत. नक्षलबारीला उडालेल्या लहानशा ठिणगीने सगळा भारतवर्ष उजळला जातो आहे. या निर्माण होणाऱ्या अग्निकुंडात, ज्यांनी लूट करून राजवाडे बांधले आहेत, ज्यांनी गरिबांचे रक्त शोषले आहे ते सर्व जळून खाक होणार आहेत. चक्र फिरू लागले आहे ते अधिक अधिक फिरणार आहे. हे जग बदलण्यासाठी जो लढा सुरू झाला आहे त्यातला मी एक पथिक आहे. अभिमान धरायचाच तर तो या गोष्टीचा. मी अजून तरी जिवंत आहे. वाटल्यास तुम्ही आशा ठेवा, की येणाऱ्या दिवसातून मी तगून राहीन. पत्र लिहिणे हे अगदी कंटाळवाणे काम मला होते. वाईट वाटून घेऊ नका आणि माझ्यावर रागावू नका. तुम्ही सर्व खुशाल आहात असे मी धरून चालतो." –तुमचा, सुदेव.

हा नक्षलवादी सुदेव, एका गरिबांचे रक्तशोषण करणाऱ्या जोतेदाराला ठार मारतो आणि पोलिसांच्या गोळीला बळी पडतो. याला संस्कृत येते. रामकृष्ण, विवेकानंद, मानवेंद्र रॉय, यांच्या शिकवणुकीने तो भारलेला असतो, कामवासना गळून पडावी यासाठी मुखात अखंड 'हरिनाम' तो ठेवतो. पण कात्रजच्या घाटातला तो नक्षलवादी – जुगार खेळतो, मुलीबाळींची अब्रू घेतो, गावातच चोऱ्या करतो! कामवासना गळून जावी म्हणून धडपडणारा सुदेव नक्षलवादी आणि हिंदी सिनेमासंगिताने अनावर झालेले कामांध देखिल नक्षलवादी! साध्या शब्दांना अशी दुर्गंधी कशी येते? शब्दांचे अर्थ असे नासके-कुजके कोण करते? शिवाचे नाव मिरवणारा सुदेव इतका 'अशिव' कसा काय असू शकतो? सज्जनांना नक्षलवाद्यांपासून भय तरी काय आहे?

कात्रजच्या घाटात शिवाजी महाराजांनी एकदा बैल पळवून मोगलांची दिशाभूल केली होती. आज मोगलाईचे वर्णन करताना वृत्तपत्रे, रुद्र रूपात येणाऱ्या शिवाच्या नंदींना, कात्रजच्या घाटात कोंडीत आहेत. जनतेचा कात्रज करणारे पत्रकार खरोखर धन्य होत! **–सेना महाराज**

# चोरटा व्यापार, माणसांचा

शशिकुमार

कोकण! या देशातील परिस्थीतीचे जिवंत उदाहरण! भारताच्या नैसर्गिक संपत्तीचा हा समृद्ध, सुंदर प्रदेश. भारताच्या समस्यांचे हे जिवंत आगरही आहे. कोकणच्या लांबलचक पसरलेल्या किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात अवजड वस्तूंचे स्मगलिंग होते. मुंबईसारख्या शहरात सोन्यासारख्या सहज छपविता लपविता येणाऱ्या वस्तूंचे 'स्मगलिंग' सहज करता येते. त्यासाठी दूरवर माल उतरून त्याची पुन्हा 'मार्केट'साठी मुंबईस आयात करावी लागत नाही. पण कापड, ट्रँझीस्टर्स, प्लॅस्टीक, जरीसारख्या वस्तूंची मुंबईसारख्या शहरात 'डायरेक्ट' आयात करण्यात कमी सुरक्षितता लाभते.

आज या अवजड वस्तूंची आयात करण्यासाठी कोकणची किनारपट्टी रात्रंदिवस जवळ जवळ नागडी उभी आहे. त्यातच दारिद्र्याने आपले हातपाय समुद्राच्या पुळणीवर अस्ताव्यस्त पसरलेले. त्यातच शासनाच्या आशीर्वादाने या प्रदेशात असलेली 'कस्टम'ची व्यवस्था हा एक विनोदच आहे. अपुरी साधने, अधिकाऱ्यांच्या हाताशी असलेली शक्तीही अपूर्ण. दूर दूर असलेली ठाणी. हे सर्व शेतात उभ्या केलेल्या बुजगावण्यासारखे आहे. चोरटा व्यापार करणारांना ही बुजगावणी परिचयाची झाली आहेत. त्यामुळे त्यांची तमा करण्याचे त्यांना कारण पडत नाही. त्यातूनही अत्यंत अल्प असा माल धरला जातोही. तो चोरट्या व्यापारातील आप-आपसातील वैरामुळे, अथवा मतभेदामुळे. अर्थातच मतभेद असतात ते या यंत्राच्या एका कुठल्यातरी निकामी झालेल्या पार्टमध्ये. कोकणातील चोरट्या व्यापारात भाग घेणारे लोक ह्या कठपुतळी बाहुल्या आहेत. त्या कुणाच्या-

तरी इशाऱ्यावर काम करीत असतात. कधी कधी या बाहुल्यांना स्वातंत्र्याची उर्मी येते. नाही असे नाही. सगळ्या चोरट्या व्यापाराचे 'मूळ' आंतरराष्ट्रीय भावात आणि भारतात असलेल्या वस्तूंच्या किमतीला असणारे जमीन-अस्मानाचे अंतर हे आहे. हे सूर्य प्रकाशाइतके स्वच्छ आहे. उदाहरण द्यायचे झाले तर प्लॅस्टीकच्या जरीचे देता येईल. एका रिळाची किमत भारताबाहेर १२ ते १३ रु. असते. त्याच रिळाला इथे ५० रु. च्या वर पैसे मोजावे लागतात.

या सगळ्या प्रकारची शासनाला कल्पना नसावी असे नाही, पण शासनाला हा चोरटा व्यापार बंद व्हावा असे वाटतच नाही. कारण शासनातील अनेकांचे हात या धंद्यात गुंतलेले आहेत. याचे एक उदाहरण सांगतो. माझे एक तरुण मित्र दिल्लीत होते. नव्याने नोकरीवर लागले होते. उमेद होती. या देशात प्रामाणिकपणे काम करणे हा गाढवपणा आहे हे कळावयाचे होते. त्यांनी धाडसाने एका माजी उपमंत्र्याच्या घरी छापा घातला. शे-दीडशे ट्रॅन्झीस्टर्स पकडले. तेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले, 'एकंदरीत त्यांचा सामाजिक दर्जा पहाता या वस्तू त्यांना आवश्यक आहेत असे समजले पाहिजे.' बिच्चारा! तोंडात बोट घालून आपल्या नोकरीत पुढे विचार करू लागला.

तेव्हा 'स्मगलिंग' ह्या व्यवहारात अशा अनेक कथा आहेत. परंतु आज एका महत्त्वाच्या पदार्थाच्या भारतातून होणाऱ्या चोरट्या निर्यातीकडे समाजाचे लक्ष वेधू इच्छितो. अर्थात या वस्तूंचा येथे तुटवडा नाही. ही वस्तू म्हणजे 'माणूस'. हे लेबर आज मोठ्या प्रमाणावर कोकणच्या किनारपट्टीवरून परदेशी जात असते. कोकणच्या दारिद्र्यामुळे हा कच्चा माल, हे बेकार गावा-गावांमधून 'अरबस्तानात' आणि इतरत्र जाण्यासाठी चातकासारखी वाट पहात असतात. पडावातून त्यांना नेणारे तर 'बकरे' असाच त्यांचा उल्लेख करतात.

हे बेकार बकरे जातात कसे? तर त्यांचेही रिझर्वेशन असते. एका यांत्रिक पडावात त्यांना भरण्यात येते. मुंबईला त्यांचे प्रमुख असतात. त्यांचे सब-एजंट अनेक मागासलेल्या गावोगावी असतात. अशा 'डुबई' आणि इतरत्र (प्रामुख्याने कुवेत) जाऊ इच्छिणाऱ्यांची एक यादी तयार होते. त्यांचे जाण्याचे भाडे फक्त ५०० रु. असते.

कधीतरी रात्री ही मंडळी निघतात. दाटीवाटीने ही यांत्रिक नौका गच्च भरण्यात येते. जाताना ही मंडळी कराची बंदर टाळून, पाकिस्तानपासून दोनशे मैल अंतरावरून जातात. एवढाच भाग प्रवासात धोक्याचा असतो. येथे समुद्र खवळलेला असतो. आरोग्याच्या दृष्टीने हे हवामान अनेकांची 'हौस' पुरविते. त्यातच पाकिस्तानी अधिकार नसताना चाचेगिरी करतात. काहींना पकडून नेतात. परवाच अशा बेकायदेशीर चाललेल्या अकरा खलाशांना पाकिस्तानने पकडून नेले. या नौकेत साध्या आरोग्याला आवश्यक अशी व्यवस्थासुद्धा नसते. किती लोक

भरले जातात हे 'रुखवर' अवलंबून असते. काल-परवा विजयदुर्गच्या खाडीमधून निघालेली अशा इच्छुकांची एक लाँच भर समुद्रात बुडाली. काही मेले. काहींना भारतीय नौकांनी हात देऊन वाचविले.

या प्रवासाला साधारण पंधरा एक दिवस लागतात. पांचशे रुपयाच्या भाड्यात दुसरा कसलाही खर्च प्रवासात करावा लागत नाही. सोबतीला इतर लोक असतात. विशेषत: ही वहातूक डहाणू, उंबरगाव, वापी आदी ठिकाणांवरून होत असल्यामुळे जोडीला वारलीही असतात.

दुबईपासून सुमारे वीस मैलांवर या मंडळींना 'खाली' करण्यात येते. तेथील अरब आणणाऱ्याला विचारतो, "इस बार कितने बकरे लाये ?"

'तिनसौ' तांडेल सांगतो.

'और बाकी कितने हैं ?'

'होंगे सौ दो सौ'

या गेलेल्या तीनशेंची नावे यादीमधून कमी झालेली असतात. येथून बकऱ्यांचा प्रवास पुढे सुरू होतो. अनोळखी वाट. बेकायदेशीर प्रवास करीत हे दुबईला पोहोचतात. पूर्वीचे तेथील रहिवाशी या लोकांना भाकर तुकडा देशाचे, धर्माचे नाते समजून खायला घालतात. येथून नेलेल्या पुंजीचे फारच थोडे त्या देशाचे नाणे 'कदिरा' तयार होते.

दुबईला राहुट्या, झोपडपट्टीसारख्या भागात कोटी कोटी रुपयांचा माल लेबरची वाट पहात असतो. 'In transist' पडलेला हा माल सगळ्या मागासलेल्या देशात जात असतो. हाँगकाँग, चीन, जपानसारख्या देशातून हा माल येथे 'गोडाऊन'-सारखा एकत्रित केलेला असतो. बिचारा आमचा बकरा येथेच कोठेतरी कामाला लागतो. 'एकटा जीव' असल्यामुळे 'हॉटेलमें खाना और मसिदमें सोना' सुरू असते. थोडी फार पुंजी जमते. ती हिंदुस्थानात परत आणता येत नाही. कारण इथे नोटा लागतात. मग तो येताना चोरटा माल आणतो. परत ५०० रु. च्या कदिरा देऊन परत येतो.

हा चोरटा व्यापार असाच चालू रहाणार आहे. त्यात एकादा 'डॉ. खोराना' अथवा बडा शास्त्रज्ञ परदेशी गेला तर लगेच 'ब्रेन ड्रेन' होते. वृत्तपत्रे जागी होतात. या विषयावर परिसंवाद होतात. पण या श्रमशक्तीच्या स्मगलिंगचे कोणाला काही वाटणार नाही. कारण आपला विश्वास श्रमापेक्षा ब्रेनवर अधिक आहे.



विजय तेंडुलकर

एका वेड्या राजाची कथा

# तुघलक

चौदाव्या शतकात महंमद तुघलक होऊन गेला. इतिहासात कोणी जगज्जेते म्हणून, कोणी मानी म्हणून, कोणी राज्यसंस्थापक म्हणून तर कोणी नादान म्हणून मर झाले. वेडा म्हणून अजरामर झालेला एकटा महंमद तुघलकच असावा. याने ांदीच्या दिनारांबरोबर तांब्याची नाणी चलन म्हणून काढली, दिल्लीची तोवर ालेली राजधानी सोडून तो दौलताबादला हलवण्याचा लोकविलक्षण बेत केला, वर हिंदूंवर जिझिया कर होता तो मुसलमानांवर बसवून त्यांची अप्रियता पत्क- ी. परिणामी एक तर राज्याचा खजिना रिता पडण्याची वेळ आली. राज्यात काळ पडले, बंडे झाली, चोर, भामटे, सोदे, लफंगे यांची चलती झाली, सर्वत्र ंदशाही माजली. एवढे थोडे झाले म्हणून की काय, स्वत:च्या परिवारातील काही श्वासू म्हणविणाऱ्या माणसांना व खुद्द त्याच्या सावत्र आईला त्याने अमानुषपणे र मारले. अखेर अखेर तो खरोखरी वेडा झाल्याप्रमाणे वागे.

गिरीश कर्नाड यांनी आपल्या 'तुघलक' नाटकात या वेड्या राजाच्या वेडाचा हे वेड सामावणाऱ्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हे नाटक त्यांनी म कानडीत लिहिले. त्याचे हिंदुस्तानी भाषांतर दिल्ली येथे रंगमंचावर आले व ले. नंतर कानडी नाटकदेखील बंगलोर येथे रंगमंचावर येऊन गर्दी खेचत

राहिले. मुंबईच्या थिएटर ग्रुपने याचे कर्नाड यांनीच केलेले इंग्रजी भाषांतर रंगमंचावर आणले आणि त्याची खूप स्तुती झाली.

तुघलक नावाचे आणखीही एक दाक्षिणात्य नाटक मागे मुंबईत झाले आहे. ते तुघलक तुघलकच्या केवळ निमित्ताने आजच्या लहरी सत्ताधाऱ्यांची खिल्ली उडवणारे होते. कर्नाड यांचा तुघलक असा कशाचेही निमित्त नाही, त्याला त्याचे असे एक संवेदनाक्षम, द्रष्टे, चिंतनशील, विलक्षण बुद्धिमान, रसरशीत व्यक्तिमत्त्व आहे. तो एवढा विचार करतो की त्याला निद्रानाश जडला आहे. एके ठिकाणी तो म्हणतो, खुदाकडे आम्ही प्रार्थना करतो की झोपेपासून आम्हाला वाचव. सारा दिवस उद्याच्या चिंता वहाव्या लागतात पण रात्र पडली की त्या साऱ्यातून आम्ही कसे बंधमुक्त होतो. विस्तीर्ण आभाळातले तारे न्याहाळतो. शायरांनी त्यांची केलेली वर्णने आठवतो. वाटते की शायरांच्या शायरीत स्वतःला झोकून द्यावे. पुन्हा वाटते, दुनियेतल्या सर्वात उंच वृक्षाच्या बाहूवर उभे राहून आमच्या प्रजेला हाकारावे, म्हणावे, या, माझ्या लेकरांनो, माझ्या लोकांनो, मी तुमच्यासाठीच इथे उभा आहे. मला तुमची दुःखे सांगा, मला तुमच्या सुखांचा वाटेकरी करून घ्या. आपण मिळून हसू या, रडू या–आणि अल्लाचे स्मरण करू या. इतके की ते करता करताच देह विरघळून जाऊ द्यात आणि रक्ताची हवा होऊ द्या. भविष्य आपले आहे, आपल्या मुठीत आहे. आपण प्रकाश होऊन ही सारी सृष्टी वनश्रीने उजळून टाकू या. आपण अंधार होऊन राष्ट्राराष्ट्रांच्या हद्दी झाकून टाकू या. अरे या, तुम्हाला भेटण्यासाठी बाहू कसे स्फुरताहेत बघा आमचे ! हे बाहू, यांचे अणुरेणू ग्रहगोलांतून पसरू मागतात; पण मुळेच जर या मातीत रुजली नाहीत तर कसे होणार हे ! वाटते की हिंदूंप्रमाणे पुनर्जन्मावर विश्वास असायला हवा होता आमचा. छे, छे ! केवळ एक जन्म ! एक हयात ! एकच देह ! आणि त्यासाठी झगडताहेत मात्र असंख्य आशा, आकांक्षा, अपेक्षा, त्यावर हक्क सांगते आमची प्रजा–या खुदा ! किती हक्क, किती मागण्या ! करायचे केवढे–केवढे बाकी आहे ! झोपण्यात वेळ घालवण्याचा काय हक्क आहे आम्हाला ?

असा कर्नाड यांचा तुघलक. रात्री या सृष्टीची रहस्ये उकलू पहात एका व्यापक पातळीवर पोचणारा. स्थलकालाच्या हद्दी भेदून पलीकडचे पाहू बघणारा, त्यासाठी तळमळणारा आणि दिवसा राजकारणाच्या–मध्ययुगीन मुसलमानी राजकारणाच्या–तेढ्या मामल्यात त्याच तेढ्या पद्धतीने मगजमारी करावी लागणारा. दिवसाच्या या जगात कोणी सरळ नाही, कोजी कोणी स्वतःपासून दूर पोचणारे नाही, स्वार्थातीत नाही, कोणी विश्वास देणारे, घेणारे नाही. पदोपदी अविश्वास. संशय. गैरसमज. तेढ. कारस्थान. पाठ वळली की दगाबाज बनण्याची प्रवृत्ती. उंच गोष्टी, व्यापक गोष्टी, दूरच्या गोष्टी समजण्याची कुवतच कोणात नाही. अशा या दिवसाच्या जगात तुघलक नालायक आणि खुळा ठरला तर नवल कसले ? तो

अपयशी ठरला तर आश्चर्य कोणते ? कर्नाड महंमद तुघलकचे अपयश, त्याचे वेडे-पण असे समजून घेऊन नाटकात मांडतात. कवी आणि तत्त्वचिंतक तुघलक या तेढ्या राजकारणात खुनी आणि क्रूर बनतो. तो तसा बनतो किंवा हा राजकारणाचा, रोकड्या व्यवहाराचा मामला त्याला तसे बनवतो. कर्नाड यांच्या लेखी या नाटकापुरती महत्त्वाची आहे ती स्वप्ने व प्रतिमा आणि राजकारण व राजसत्ता यांच्या कात्रीत सापडलेल्या, आपली उंची भोवतालच्या खुज्या मानवी व्यवहारात सामावू न शकलेल्या न शकणाऱ्या मोठ्या राजाची शोकात्मिका.

तुघलकची ही शोकात्मिका भेदक करण्यासाठी कर्नाड यांनी कटकारस्थाने, खून लढाया या मध्ययुगीन राजकीय व्यवहारांचा उपयोग तर करून घेतलाच आहे परंतु त्याहीपलीकडे दोन निव्वळ पोटभरू माणसांना त्यांनी नाटकात सोडून दिले आहे. यातला एक सरळ सरळ भामटा आहे. कर्नाड त्याला अल्लदपणे तत्कालीन राजकारणाच्या सावळ्यागोंधळात नेऊन सोडतात आणि या अझीझ नामक पोटभरू पेंढाऱ्याचे उत्तम चालते. इतके की एके ठिकाणी तो खुषीत आपल्या जोडीदारास राजकारणाविषयी ऐकवतो, बघ, माझ्याकडे जरा बघ ! दिल्लीत येऊन महिने लोटले नाहीत तो मला एक भलेथोरले नवे क्षेत्र सापडले आहे–राजकारण ! साले काय


# मुजऱ्याचे मानकरी

**ब. मो. पुरंदरे**

**तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

नामी क्षेत्र आहे ! दोस्त, आपले नशीब यानंतर त्या क्षेत्रात असणार आहे. अरे या क्षेत्रात काय नाही ? विचार ! पैसा आहे, यश आहे, मानमरातब आहे, सत्ता आहे, आणि पुन्हा इथे हरघडी भेटतात म्हणशील तर एकजात बुद्दू ! एकाच्या टाळक्यात कांही स्वतःचे नसते. तिकडे गावाकडे कोणाचा एकादा फाटका कपडा चोरण्यासाठी केवढे बुद्धीला कष्ट पडायचे—तुला सांगतो, त्याच्या निम्म्याने जरी अक्कल या राजकारणात वापरली ना, तर सत्तेची महावस्त्रे अंगावर चढतात, आहेस कोठे ? पुन्हा ती चोरावी लागत नाहीत, राजरोस येतात ! ...

हा अझीझ नामक भुरटा, पोटभरू, चलाख पेंढारी आणि तत्त्वचिंतक, ज्ञानाचा भुकेला बादशहा तुघलक अशी दोन टोके कर्नाड आपल्या नाटकाला आरंभापासून निर्माण करतात. दृश्यादृश्याच्या रचनेतून या जमीन अस्मानासारख्या पातळ्या ते क्रमशः जवळ आणीत निघतात. अझीझ दिल्लीकडे येतो. अरेबियातून तुघलकच्या निमंत्रणाने आलेला तेथील खलिफाचा वंशज घियासुद्दिन अब्बासिद चुकून अझीझच्या हाती एकटा सापडतो. महत्त्वाकांक्षा चाळवलेला अझीझ त्याला ठार मारून त्याची वस्त्रे परिधान करून व त्याची अंगठी बोटात ठेवून खलिफाचा वंशज म्हणून दिल्लीत अवतीर्ण होतो आणि तुघलकचा यथास्थित पाहुणचार भोगतो तिथे या दोन पातळ्या प्रत्यक्ष समोरासमोर येऊन भिडतात, पुष्कळ काही सूचित करतात. पुढे तुघलकच्या ध्यानी या पेंढाऱ्याचे कृत्य येते आणि विलक्षण संतप्त होऊन त्याला तो मृत्यूची सजा देऊ पहातो परंतु तो ती देऊ शकत नाही इतका हा माणूस त्याला कळतो आहे, त्याला भोवतालच्या गाठाळ, वक्र मनांच्या राजकारणी दरबारी जगात एका नितळ सामान्यत्वाचा आणि चातुर्याचा प्रत्यय देतो आहे. ज्येष्ठांच्या अनुकरणापलीकडे तो सामान्य, हुशार माणूस दुसरे काय करतो आहे ? तुघलक एकीकडे त्याच्यावर चक्क लोभावतो. निर्धाराने तो त्याला दूर पाठवतो—त्याच्या जीवितरक्षणाची व्यवस्था करून, त्याला 'सरदार' करून !

तुघलकच्या व्यक्तिरेखेत आणखी एक छोटासा पण मार्मिक तपशील कर्नाड यांनी मिसळला आहे. तो बुद्धिबळ खेळतो. जगातील मोठमोठ्या बुद्धिबळपटूंचे डाव मागवून ते जाणून घेऊ बघतो. बुद्धिबळाच्या पटावर चालतात तसलेच डाव त्याला राजकारणाच्या धकाधकीत खेळावे लागतात आणि ते तो विलक्षण तडफेने खेळून उघड व छुप्या प्रतिस्पर्ध्यांस निष्प्रभ, क्वचित निष्प्राण करतो. तिथे त्याला जोड नाही. म्हणजेच हा तुघलक मुत्सद्देगिरीत डावा नाही, त्याला मागे व खाली खेचते ते त्याच्यातील सहृदय तत्त्वचिंतकाचे मन आणि द्रष्ट्याचा स्वप्ने पाहण्याचा ध्यास. तुघलक निश्चितपणे मोठा राजा होता, तो अपयशी आणि वेडा ठरला तो त्याच्या या, राजकारणी बुद्धिबळात हानीकारक ठरणाऱ्या दोन गुणांनी—असा कर्नाड यांच्या 'तुघलक'चा रोख आहे. तो ना लायक राजा म्हणून गाजला की निखळ तत्त्वचिंतक म्हणून जगला. त्याच्या पदरी असलेला बरानी नावाचा बखरकार हे कर्नाड

यांनी योजलेले एक चांगले पात्र. तो आरंभी एक ठिकाणी तुघलक याला म्हणतो, हुजूरांनी विश्वासात घेतलेच आहे तर एक सूचना करण्याचे धाडस सेवकाने करावे काय ? हुजूरे आला, तत्त्वज्ञान आणि काव्यातील एक गाढे व्यासंगी म्हणून आपली ख्याती साऱ्या दुनियेत आहे. इतिहास निर्माण करावयाचा तर तो केवळ राजकाजात निर्माण होतो असे नाही. तो विद्वान व व्यासंगी जनांच्या वर्तुळातदेखील घडविता येतो आणि तिथेच तो चिरस्थायी होतो. आपले स्थान तिथे आहे, खाविंद. ते मुडद्यांच्या बाजारात नाही. हाच बरानी पुढे एके ठिकाणी कळवळून तुघलकच्या एका प्रश्नावर म्हणतो, खाविंद, एक काळ होता जेव्हां आपली प्रेमावर, शांतीवर, अल्लावर नितांत श्रद्धा होती. त्या श्रद्धांचे पुढे काय झाले, खाविंद ? त्या कोठे आहेत ? आज आपण प्रजेस धड नमाज पढू देत नाही. क्षुल्लक गुन्ह्यासाठीही भयंकर सजा फर्मावता. साध्या संशयानेही वधस्तंभ दाखवता. का हा सारा रक्तपात ? थांबवा हा, हुजूर, हा थांबवा ! तुघलकमधील विपरीत बदलाला हा बखरकार बरानी कर्नाड यांनी कायम साक्षी ठेवला आहे.

हा बदल कोठवर घडतो ? नाटकाअखेरी तुघलकच्या डोळ्यात मनस्वी भय आणि वेडाची स्पष्ट छटा दिसते, एवढे सुचवून कर्नाड थांबले आहेत. पहिला उमेदीतील निर्भय तत्त्वचिंतक आणि हा भयगंडाने पछाडलेला रक्तपिपासू ही तुघलकची दोन दर्शने पुरेशी बोलकी आहेत.

असा कर्नाड यांचा तुघलक थिएटर ग्रुपने इंग्रजीत रंगमंचावर आणला तो नजर दिपविणाऱ्या अलीशान नाट्यप्रयोगाने. या प्रयोगातील नेपथ्यापैकी भले जंगी महाद्वारवजा दरवाजे तत्कालीन शाही वैभवाचे आणि दबदब्याचे सूचक वाटत होते. पोषाखात मूळ काळाची जाणीव आणि आजच्या प्रेक्षकांस ते सुखद वाटतील याचे भान कायम ठेवलेले दिसले. प्रकाशयोजना आणि पडद्यामागील 'इफेक्टस्' वैशिष्ट्यपूर्ण त्याचप्रमाणे अचूक वाटले. किंबहुना एकूणच तांत्रिक अंगात एका अव्वल ऐतिहासिक नाटकाचा दर्जा सांभाळलेला होता आणि त्याचा इष्ट तो प्रभावदेखील पडत होता.


या जोडीला आवश्यक तो शब्द आणि अभिनय यांचा प्रभाव मात्र अपेक्षेप्रमाणे जाणवला नाही. दोन की तीन भूमिका सोडल्या (शेख इमामुद्दिन, घियासुद्दिन अब्बासिद, अझीझ) तर बाकी भूमिकातील नट त्यांच्या भूमिका वाटले नाहीत, त्या भूमिकांच्या छायाकृती वाटले. खुद्द तुघलकच्या भूमिकेत कबीर बेदी हा सहा फूट उंचीचा अतिशय देखणा नट त्याच्या रुबाबाने शोभला परंतु तुघलकचे एका वेळी रांगडे आणि सुसंस्कृत, भव्य आणि संवेदनाक्षम, मानवतेवर प्रेम करीत असूनही आपल्यातील सुप्त हिंस्रतेने क्षणिक थरकाप उडविणारे तल्लख व्यक्तिमत्त्व उणेच रहात गेले. उत्तरार्धात तुघलकची ही सुप्त हिंस्रता अधिकाधिक वर येते, रक्तातील ही हिंस्रता आणि मनातला तात्त्विक संघर्ष यांच्या तिढ्यात

सापडून पिसाळणारा 'वेडा' महंमद तुघलक बेदींच्या राजस व्यक्तिमत्त्वा उतरूच शकला नाही. आपल्याविरुद्धची कट कारस्थाने आगाऊ डाव खेळून सर्व उलथविणारा प्रखर बुद्धिमान तुघलक बेदींच्या मुद्रेवर, हालचालीत, स्वरा कोठेच आला नाही. बेदींचा तुघलक अधिक अहिंसक, तत्त्वज्ञानी, मृदु वाटला.

याला कदाचित इंग्रजी भाषांतरही (कर्नाड यांनी स्वतःच ते केले आहे; काही प्रमाणात कारणीभूत असू शकेल. या इंग्रजीला ऐतिहासिक पीळ नाही. ते अधिक आजचे आहे. संवादद्वारे अभिव्यक्ती साधण्याचे व्यक्तीव्यक्तीचे वेगवेगळे व्यक्तिविशिष्ट पोतही संवादात उणे वाटले. धोबी आणि इतिहासकार एकाच प्रकारच्या शब्दसमुच्चयानिशी परंतु आपापल्या अनुभवातून बोलले. या एकाच एका इंग्रजी वळणाला व्यक्तिरेखेगणिक वेगळे उच्चारण देण्याचा दिग्दर्शकांचा प्रयत्न असावा परंतु त्याने विशेष काही साधले नाही.

प्रयोगातील वजनदार व भव्य नेपथ्याने प्रयोगाची गती अधिक संथ केली असेही वाटले. मूळ नाटकात पूर्वार्धात ती तशी संथच आहे; उत्तरार्धात मात्र ती बरीच वाढते. प्रयोगात उत्तरार्ध देखील संथ वाटला. तसेच नेपथ्यावर घेतलेली मेहनत व दाखविलेली कल्पकता लक्षात घेता, उत्तरार्धात दालनातील प्रवेश रस्त्याच्या नेपथ्यावर घ्यावा लागला ते खटकले. असे वाटले की, एवढ्या भव्य नेपथ्याची भानगड न ठेवता कामचलाऊ परंतु प्रकाशयोजनेने भव्यतेचा परिणाम साधणारे कलापूर्ण नेपथ्य वापरण्यात येते तर खटकणारी ही जागा खटकली नसती व प्रयोगाचा वेग वाढू शकला असता.

प्रयोगात असे सर्व उजवे डावे असूनही 'तुघलक' परिणाम साधून गेला हे तरीही खरे. हा परिणाम अर्थातच प्रामुख्याने मूळ नाटकाचा. म्हणूनच नाटक संपून दर्शनी पडदा खाली आल्यावर आणि प्रेक्षकांच्या मागणीवरून तो पुन्हा वर गेल्यावर जेव्हा 'तुघलक' बेदींनी लेखक गिरीश कर्नाड यांस रंगमंचावर पाचारण केले आणि काळा मुंडेछाट झब्बा परिधान केलेले गोरे, तरुण कर्नाड रंगमंचावर चढले, तेव्हा झालेल्या टाळ्यांच्या प्रचंड आणि प्रदीर्घ कडकडाटात आपल्या बऱ्याच होत्या.



रशियन जनतेने क्रांतिकारक उठाव करून गाडलेले झारशाहीचे भूत आंध्रप्रदेशाच्या राजधानीत पुन्हा प्रगट झाले आणि अन्न-काम-निवारा मागणाऱ्या आदीवासी-भूमिहीन शेत मजुरांवर त्याने गोळ्या चालवल्या. अशा वेळी आंध्रमधील विविध राजकीय पक्ष-संघटना काय करत होत्या ?–झोपा काढत होत्या !

अक्षरशः झोपा काढत होत्या !

गांधी भवनातील सर्वोदय मंडळाच्या कार्यालयात मी गेलो तेव्हा पंख्याच्या गार वाऱ्यात एक सर्वोदयी कार्यकर्ते खुर्चीवर पाय घेऊन



# गाडलेल्या बंदुका उठली जनता

झुलक्या घेत होते. सुमारे अर्धा पाऊण तास मी बडबड केल्यानंतर त्यांना माझ्य येण्याचे प्रयोजन समजले व त्यांनी माझेपुढे एक पुस्तिका टाकली. ती पुस्तिका आंध्रप्रदेश सर्वोदय मंडळाचे कार्य विवरण करणारी होती. त्या पुस्तिकेचे एकंदरीत स्वरूप देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण संघाच्या किंवा चांद्रसेनीय कायस्थ प्रभु महिला मंडळाच्या वार्षिक सभेच्या वृत्तांतासारखे भासले. सोळा पानांच्या त्या पुस्तिकेत आंध्रमधील शेतकरी-आदिवासी यांच्या एकाही समस्येचा अथवा त्यावरील उपाय-योजनेचा उल्लेख नव्हता. अगदी शेवटच्या पानावर पुरवणी 'चिकटवली' होती. त्यात आजपर्यंतच्या मिळालेल्या दानांचा तपशील आहे.

गेल्या वीस वर्षात आंध्रमध्ये सर्वोदयवाद्यांनी २,४१,९५२ एकर जमीन भूदानात कमावली. पैकी त्यांच्याच आकडेवारीप्रमाणे ८६,३८५ एकर जमीन पूर्ण-तया कसावयास नाकाम किंवा कोर्टदरबारी अडकलेली आहे. म्हणजेच दानाच्या नावाखाली करण्यात आलेली फसवणूक आहे. ५२,२१६ एकर जमीन वाटण्यास 'कार्यबाहुल्यामुळे' सर्वोदयवाद्यांना वेळच झाला नाही. राहता उरली १,०३,३५१ एकर जमीन, जी जमीनदारांनी सांगितली त्यांना, म्हणजेच त्यांच्या बगलबच्चांना वाटण्यात आली. थोडक्यात गेल्या वीस वर्षात या प्रश्नाची उकल करण्यासाठी सर्वोदयवाद्यांनी काहीही केले नाही.

हिंदुस्थानच्या आजपर्यंतच्या इतिहासात सत्ताधाऱ्यांनी पाशवीबळ आणि धर्म या दोहोंच्या सहाय्याने इथल्या जनतेला गुलाम केले. तलवारीच्या जोरावर त्यांच्या शरीरावर कब्जा मिळवला आणि धर्माच्या जोरावर मनावर. आणि म्हणूनच जगातील इतिहासात सर्वात जास्त हीन वागणूक ज्यांना मिळाली त्या हरिजनांनी-सुद्धा गेल्या २००० वर्षात कधीही बंडे केली नाहीत. या इतिहासाचीच परंपरा आजचे सत्ताधारी चालवतात म्हणूनच अन्न मागणाऱ्या जनतेला गोळ्या घालणाऱ्या या सत्ताधाऱ्यांना संत वगैरे सदैव आपल्या हाताशी लागतात.

आमच्या पांढऱ्या कॉलरच्या बुद्धीवादी वर्गाला — जो रोख चाळीस पैसे टाकून 'माणूस' विकत घेतो त्याला रोज सत्तावीस नये पैसे देखील उत्पन्न नसलेल्या जनतेचे दुःख समजणार नाही. आमच्याकडे गमवायला तीन-चार आकडी पगार आहेत. पांढरी कॉलर आहे म्हणून आम्ही हिंसेला भिणार, सशस्त्र क्रांतीचा निषेध करणार. परंतु ज्यांच्याकडे गमवायला प्राणाशिवाय काही नाही व सध्याच्या समाजात ज्यांच्या प्राणाला मातीचेही मोल नाही त्यांनी हिंसेला, क्रांतीला का भ्यावे ?

---

अनिल वर्वे — लेखांक दोन

---

वरंगळ येथे एका मोठ्या जनसंघीय नेत्याकडे गेलो. राजकारणाविषयी शून्य माहिती असलेल्या या व्यक्तीनें मला सांगितलें – ‘ माझा बंगला रिकामा पडला होता तो मी जनसंघाच्या कार्यालयाला दिला एवढाच माझा त्या पक्षाशी संबंध. ’ वरंगळ शहरात हे मेडिकल स्टोअरवाले जनसंघाचे बडे नेते समजले जातात. अशा या ‘ राष्ट्रवादी ’पक्षाने त्यांच्या एल्. एस्. राजू या सदस्याला पाठवून एक अहवाल तयार केला. या अहवालात नक्षलवादी उद्रेकांचा विपर्यस्त आणि विकृत अर्थ लावून या महाशयांनी शेवटी उपाय योजना सुचवली–

‘ राष्ट्रद्रोही-परधार्जिण्या वृत्तीचा आणि बंडाळीचा पाडाव करण्यासाठी आणखी पोलीस कुमक पाठवावी. प्रत्येक पोलीस चौकीला वायरलेस सेट बसवावेत. प्रत्येक खेड्यापर्यंत ‘ पोलीस-जीप ’ पोचेल असे रस्ते बांधावेत आणि गावातील ‘ सावकार-जमीनदारांना ’ स्वसंरक्षणासाठी बंदुका द्याव्यात आणि अत्यंत कडकपणे नक्षल-वाद्यांचा बीमोड करावा. ’

या राष्ट्रवादाच्या ठेकेदाराने उर्फ एल्. एस्. राजूने उपाशी मरणाऱ्या लोकां-करता चार अश्रू ढाळले असतें तरी त्याच्या पापाचे बरेच क्षालन झाले असते, परंतु हे साधे सौजन्यसुद्धा या गृहस्थाने दाखवलेले नाही.

‘ कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया ’ म्हणजे गरीबांविषयी कळवळा आणि सहानु-भूती वाहणारी चार बुद्धिजीवी डोकी. या डोक्यांनी सध्या जमिनी ताब्यात घ्यायचा, म्हणजे जमिनीला पदस्पर्श करायचा कार्यक्रम हाती घेतला आहे. कारण हे जमिनी ताब्यात घेतात आणि पिके पोलीस ताब्यात घेतात. परंतु या पक्षाने नाही म्हणायला, पक्षातील ५२ वकिलांची एक समिती नेमून इथल्या आदिवासी जनतेवर भरण्यात आलेल्या शेकडोंनी खोट्या केसेस् चालवायची जबाबदारी तिच्यावर सोपवली आहे.

**C. P. I. (M)** जवळ जवळ संपलेली आहे. या पक्षाचे अर्ध्याहून अधिक सदस्य कॉम्युनिस्ट-रेव्होल्युशनरी (नागी रेड्डी ग्रुप) किंवा कम्युनिस्ट पार्टी मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट (चारू मुझुमदार ग्रुप)मध्ये जाऊन दाखल झालें आहेत. हैद्राबादसारख्या मोठ्या शहरात या अखिल भारतीयपक्षाचे कार्यालयसुद्धा नाही. नाही म्हणायला ‘ Raise your voice against Landlord-Police terror in Andhra Pradesh ’ ही पुस्तिका प्रसिद्ध करून जमीनदार-पोलीस यांनी केलेल्या अमानुष अत्याचाराला या लोकांनी वाचा फोडली. पुस्तिकेत अनेक अत्या-चारांची यादी दिली आहे. पैकी काही ठिकाणी मी प्रत्यक्ष जाऊन आलों आणि अंगावर काटा उभे करणारे हे अत्याचार खरे असल्याचे आढळून आले.

कम्युनिस्ट पार्टी मार्क्सिस्टने आक्टोबर १९६६ मध्ये ‘ नूरमहल ’ येथील केंद्रीय समितीच्या बैठकीत किसानांमध्ये पक्षाने कार्य करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादून कार्यक्रमाची दिशाही आखली. परंतु त्याची कार्यवाही करण्यात आली नाही. आज

आंध्रमधील किसानसभा उजव्या कम्युनिस्टांच्याच प्रभावाखाली आहे.

प्रजासमाजवादी – समाजवादी शोधल्यास कुठं तरी सापडतो.

जेव्हा नक्षलवादी क्रांतिकारकांचा उठाव शहरात जाणवण्या इतपत पेटला, 'द डेक्कन क्रॉनिकल', 'लीडर' आदी वृत्तपत्रांनी आदिवासी – गरीब शेतकरी यांचेवर अन्याय होत असल्याचे मान्य केले व नक्षलवादी प्रवृतीला राजकीय–आर्थिक उपाययोजनेने धरबंध घालण्याचे आवाहान केले, तेव्हा आंध्रच्या जामीनदार–सावकार सरकारने जनतेच्या डोळ्यात ५३ कोटींची धूळफेक केली. ट्रायबल एरीया करता ५३ कोटी २० लक्ष रुपयांचा प्लॅन आखून 'आस्वानपेक्षा जास्त' त्याचा गाजावाजा करण्यात आला. परंतु ज्यांना इथल्या जनतेचे प्रश्न माहीत आहेत त्यांना हा प्लॅन किती फसवा आणि पोकळ आहे हे ध्यानात येईल. हा मास्टर प्लॅन मंजुरीसाठी केंद्राकडे पाठवण्यात आला आहे. ( तो केव्हा पास होईल ते एक हरी जाणे ) त्या प्लॅनप्रमाणे –

१ : १३·३८ लक्ष रुपये दळणवळणावर खर्च करण्यात येणार आहेत. आज पठारावर १०० चौ. मैलाला ३८ मैल लांबीचे रस्ते आहेत तर आदिवासी विभागात ६·७ रस्ते असून तेही धड अवस्थेत नाहीत. ही तफावत भरण्यासाठी ३६०० मैल रस्त्यांची आवश्यकता आहे. परंतु या प्लॅनमध्ये ६०० मैल रस्त्यांची तरतूद असून प्रथम सर्व आठवडे बाजार जोडण्यात येतील.

२ : ग्रामीण विकासासाठी १२·६३ लक्ष रुपये कर्ज वाटप.

३ : ६५ लक्ष रुपयांची दीर्घमुदतीची कर्जे, ऑइल इंजिने, इलेक्ट्रिक मोटार यांचे खरेदीसाठी.

४ : ३० लक्ष रुपये विहिरी व पाटबंधाऱ्यांसाठी खर्च.

५ : २·९२ लक्ष रुपये अल्पमुदतीची शेती कर्जे.

६ : ६ कोटी रुपये विजेवर खर्च करण्यात येतील. आज प्रांतात २१·९२% खेड्यांना वीज आहे, तर ट्रायबल एरियात १·३% खेड्यांना वीज आहे. वर्षाला १०० या गणिताने ४ वर्षात ४०० खेड्यांना वीज पुरवठा करण्यात येईल.

७ : मायनर इरिगेशनवर ३·६५ लाख रुपये खर्च करण्यात येतील. प्रथमवर्षी ५००० एकर, दुसऱ्या वर्षी १०००० एकर, तिसऱ्या वर्षी १५००० व चौथ्या वर्षी २५४६६ एकर जमीन पाण्याखाली भिजवण्यात येईल.

"या व्यतिरिक्त सर्व तात्पुरती उभारलेली पोलीस स्टेशने कायम केली जातील व त्यांना जीप्सचा पुरवठा करण्यात येईल."

वरील प्रकारे ५३ कोटी रुपयांची उधळण करून त्याचा लाभ जमीनदार–सावकारांना देण्यात येणार आहे. ज्याला एकवेळच्या अन्नाची भ्रांत तो आदिवासी काय आपल्या शेणामातीच्या घरात विजेची रोषणाई करणार आहे? ज्याच्याकडे गुंठाभर जमीन शिल्लक नाही तो काय विजेचे पंप खरेदी करणार आहे? विहिरी

खोदणार आहे? जो जंगलात लहान लहान वाड्यातून राहतो त्याला काय हे ग्रामीण विकासाचे कर्ज मिळणार आहे? थोडक्यात याचा सर्व लाभ जमीनदार–सावकार उपभोगणार, आदिवासींची पहिल्या सारखीच दैन्यावस्था राहणार. त्यांची परिस्थिती सुधारावयाची असेल तर––

१ : कमाल जमीनधारणा कायदा, कूळकायदा यातील साऱ्या पळवाटा बंद करून त्यांची कडक अंमलबजावणी केली पाहिजे.

२ : गहाणवटीच्या नावाखाली लादलेल्या जमिनी सावकारांकडून काढून त्या आदिवासींना परत केल्या पाहिजेत व त्या कसण्याकरता योग्य आयुधे–बियाणांचा पुरवठा केला पाहिजे.

३ : जंगलविभाग लिलावपद्धतीने न विकता तो आदिवासींनाच दिला पाहिजे.

४ : आदिवासी विभागात एकाधिकार खरेदी पद्धतीने त्यांच्या कडून जंगलसंपत्ती योग्य दाम देऊन खरेदी केली पाहिजे.

५ : स्वस्त धान्यांची दुकाने काढून जीवनावश्यक गरजांचा पुरवठा वाजवी भावात केला पाहिजे.

६ : आदिवासी–शेतमजुरांकरता योग्य मजुरी ठरवून त्याची अंमलबजावणी होते की नाही ते पाहिले पाहिजे.

७ : आदिवासी विभागात त्वरित लघु उद्योग–कुटिरोद्योग काढून त्यांना कामधंदा पुरवला गेला पाहिजे.

८ : शिक्षण–आरोग्य–दळणवळण यांच्या सोयी केल्या पाहिजेत. परंतु वरीलपैकी महत्त्वाच्या सातही योजना डावलून व त्यामुळे आठवी नाकाम बनवून सरकारने जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली व अशा रीतीने सावकार–जमीनदार यांनी चालवलेल्या आदिवासींच्या शोषणाला पुन्हा निर्लज्ज पाठिंबा दिला.

□

आंध्र किंबहुना संपूर्ण भारतात शेतमजूर-कामगार आणि आदिवासी यांची अशी शोचनीय अवस्था असताना जनतेचे पक्ष म्हणून बिरुदले गेलेले दोन्ही कम्युनिस्ट पक्ष निवडणुकांचे राजकारण आणि संसदीय प्रतिष्ठा, मानसन्मान यांना भुलले व त्यांनी संपूर्ण ‘भांडवलदारी लोकशाही’ मार्ग स्वीकारला. जनतेच्या चळवळीवरील त्यांचे लक्ष उडाले. कामगार संघटनांनाही कार्यकर्त्यांच्या पोटासाठी आणि आर्थिक प्रश्नांसाठीच केवळ संघटीत करण्यात आले. त्यामुळे मालक व सरकार कामगारांच्या तोंडावर चार रोटीचे तुकडे फेकून त्यांना गप्प बसवू लागले. कामगारांच्यात राजकीय जागृती निर्माण न झाल्याने, प्रचलीत वर्गीय राजकारण न उमजून कामगार भांडवलदारांच्या हस्तकांच्या जातीय-प्रांतीय प्रचाराला सहज

वळी पडू लागले. ज्या कम्युनिस्ट पक्षाने व नेतृत्वाने हाडाची काडे व रक्ताचे पाणी करून कामगारांना हक्क, अधिकार व मानाचे जीवन मिळवून दिले त्याच कम्युनिस्ड पक्षाच्या व नेतृत्वाच्या जिवावर मुंबईचा कामगार शिवसेनेच्या नेतृत्वाखाली उलटतो, हे एरव्ही कशाचे लक्षण मानायचे !

१९०८ साली लोकमान्य टिळकांना अटक होताच मुंबईच्या गिरणी कामगारांनी उत्स्फूर्त हरताळ पाडला. तेव्हा लेनीनने त्या हरताळाचे 'कामगारांची राजकीय जागृती' म्हणून स्वागत केले होते. लेनिनच्या त्या उद्‌गारात क्रांतिकारी पक्षाला केलेले मार्गदर्शन होते. परंतु गेली २० वर्षे कम्युनिस्ट पक्ष व नेतृत्व निवडणूक व संसद यांच्या जाळ्यात पुरते फसले. परिणामी जनतेच्या क्रांतिकारी लढ्याची पिछेहाट झाली. ६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत या प्रवृत्तीचा कळस झाला. सर्वत्र आघाड्यांचे राजकारण करून, क्रांतिकारक कम्युनिस्ट पक्ष बार्गेनिंग पॉवर म्हणून उभा राहिला. अर्थात बार्गेनींग करण्यात सट्टेबाज भांडवलदार व त्यांचे सरकार काय कमी हुषार होते ? हा सौदा भांडवलदारांच्या फायद्यात पडला. कम्युनिस्ट ज्योती बसूंचे पोलीस अन्न मागणाऱ्या किसानांवर गोळीबार-दडपशाही करू लागले.

वस्तुतः पॅरीस कम्युनने व त्यानंतर रशियन क्रांतीनेही (१९०५ मधील) हे स्पष्ट केले आहे की प्रस्थापित 'भांडवलदारी राज्ययंत्रणा' वापरून समाजवादाकडे जाता येणे शक्य नाही. त्याकरता राज्ययंत्रणा जनक्रांती घडवून मोडून तोडून टाकली पाहिजे व नवी 'जनतेची लोकशाही' प्रस्थापित केली पाहिजे. परंतु या इतिहाससिद्ध सिद्धांताकडे हिंदी कम्युनिस्ट नेतृत्वाने दुर्लक्ष केले.

कम्युनिस्ट पक्षाच्या या क्रांतिविरोधी आणि कामगार-किसानांचा घात करणाऱ्या धोरणास कंटाळून शेकडो कम्युनिस्ट कार्यकर्ते पक्षाबाहेर पडले. त्यांना क्रांतिकारी पक्ष व कार्यक्रम हवा होता. दरम्यान सदुसष्टच्या मेमध्ये चारू मुझुमदार-कनु संन्याल-जंगल संथाळ यांच्या नेतृत्वाखाली नक्षलबारीमध्ये सशस्त्र उठाव झाले. क्रांतिकारकांनी 'ऑल इंडिया को ऑर्डिनेशन कमिटीची' स्थापना केली. प्रांतोप्रांती कम्युनिस्ट क्रांतिकारक संघटित होऊ लागले. त्यांच्या 'स्टेट को-ऑर्डिनेशन कमिटीज्' स्थापल्या गेल्या.

आंध्रमध्ये सदुसष्टच्या मध्यापासून सर्व लहान-मोठ्या शहरातून क्रांतिकारी घोषणा व भित्तीपत्रके चिकटवण्यात येऊ लागली. घोषणा लिहून, भित्तीपत्रके चिकटवून क्रांती होते काय ? होत नसेलही. परंतु या घोषणांद्वारे नक्षलवाद्यांनी स्वतःचे अस्तित्व दाखवले. आपली भक्कम संघटना बांधली. वरंगळच्या भिंती लाल घोषणांनी आजही भरल्या आहेत—

कुत्र्यासारखे उपाशी मरण्याऐवजी शहीद मरण पत्करा.

सत्तेचा जन्म बंदुकीच्या नळीतून होतो.

नक्षलबारी झिंदाबाद. माओ झिंदाबाद. कनु संन्याल झिंदाबाद.

अशा गंभीर परिस्थितीत कम्युनिस्ट पार्टी मार्क्सिस्टच्या केंद्र समितीची बैठक सदुसष्टच्या ऑगस्टमध्ये मदुराई येथे भरली. त्या बैठकीपुढे 'आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळी 'वरील प्रबंध मांडला गेला. परंतु केंद्र समितीवरचे आंध्रचे चार प्रमुख नेते – टी. नागी रेड्डी, कोला वैंकेय्या, चंद्रपुला रेड्डी आणि देवपुल्ली वेंकटेशराव यांनी त्या मसुद्यास विरोध केला. या चौघांनी एक वेगळा क्रांतिकारी कार्यक्रम आखला व तो नंतर डाव्या कम्युनिस्ट पक्षांच्या आंध्र शाखेच्या जानेवारी ६८ मध्ये 'पालकोल' या वेस्ट गोदावरी जिल्ह्यात भरलेल्या अधिवेशनापुढे मांडला. बहुसंख्य सभासदांनी 'मदुराई डॉक्युमेंट' फेटाळून टी. नागीरेड्डी व चंद्रपुला रेड्डी यांचा ठराव मान्य केला. परंतु अ. भा. समितीच्या सभासदांनी अधिकृतरीत्या एप्रिल ६८ ला 'बरद्वान' येथे मदुराई डॉक्युमेंट मान्य केला.

वरील चार नेत्यांनी – ज्यापैकी देवपुल्ली वेंकटेशराव हे तेलंगणच्या सशस्त्र उद्रेकातील माजी प्रमुख नेते होते, आपल्या वैचारिक सिद्धांताला व कार्यक्रमाला मान्यता मिळविण्यासाठी आंध्रप्रदेशामध्ये संघटन सुरू केले. तेव्हा पक्षविरोधी कारवायांबद्दल डाव्या कम्युनिस्ट पक्षाने वरील चौघांना १६ जूनला पक्षाबाहेर हाकलले. पक्षाबाहेर पडताच या चौघा नेत्यांनी कृष्णा जिल्ह्यात 'विजयवाडा' येथे २९–३० जून ६८ च्या बैठकीनंतर 'कम्युनिस्ट रेव्होल्यूशनरी' या पक्षाची स्थापना करून ९ सदस्यांची समिती निश्चित केली. चार सदस्यांची एक कार्यकारिणी निर्माण करण्यात आली–तिच्यात टी. नागीरेड्डीसुद्धा होता. 'कम्युनिस्ट रेव्होल्यूशनरी' (नागीरेड्डी ग्रुप) यांनी जाहीर केले की–माओ, लेनिन यांच्या विचाराप्रमाणे सद्य:स्थितीत


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

लोकशाही संसदीय मार्गाचा त्याग करून जनतेने सशस्त्र क्रांतीसाठी तयार व्हावे. पुढे ही स्टेट को ऑर्डीनेशन कमिटी कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या ऑल इंडिया कोऑर्डिनेशन कमिटीत ऑक्टो. ६८ मध्ये विलीन झाली. परंतु या दरम्यान विजयवाडा येथे स्टेट को ऑर्डीनेशन कमिटीची २३–२४–२५ जुलै ६८ ला बैठक भरून त्यात दोन मसुदे संमत केले गेले. १ : नवदुरुस्तीवादाविरुद्ध (कम्युनिस्टपार्टी मार्क्सिस्ट) तीव्र वैचारीक संघर्ष उभारणे. २ : जनतेस वर्गीय प्रश्नांवर संघटीत करणे.

वृत्तपत्र प्रतिनिधींशी बोलताना २ ऑगस्ट ६८ ला नागीरेड्डीने जाहीर केले–

'कम्युनिस्ट रेव्होल्यूशनरी लवकरच तेलंगणच्या ४८ ते ५१ च्या लढ्याप्रमाणे लढा संघटीत करणार असून त्यांचा संसदीय लोकशाहीवरचा विश्वास उडाला आहे. चीनी कम्युनिस्ट पक्षाच्या आदर्शाप्रमाणे सशस्त्र जनक्रांतीशिवाय देशाला पर्याय नाही.'

परंतु या घटना घडत असतानाच 'ऑल इंडीया को ऑर्डीनेशन कमिटीशी' म्हणजे कम्युनिस्ट पार्टी मार्क्सिस्ट लेनिनिस्ट (चारू मुझुमदार ग्रुप)शी 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी' (नागीरेड्डी ग्रुप) यांचे कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवरून मतभेद होऊ लागले. दोघांनीही एकमेकांवर क्रांतीचा घात करणारे म्हणून आरोप केले. याच वेळी श्रीकाकुलम येथे आदिवासींमध्ये काम करीत असलेल्या क्रांतिकारकांनी 'स्टेट को ऑर्डीनिशन' कमिटीला डावलून 'ऑल इंडिया को ऑर्डीनेशन कमिटीशी' परस्पर संबंध प्रस्थापित केले. अशा रीतीने 'ऑल इंडिया को ऑर्डीनेशन कमिटी' व 'श्रीकाकुलम डिस्ट्रिक्ट कमिटी' यांच्याशी 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी' पक्षाचे भांडण विकोपाला गेले.

'सत्ता ही बंदुकीच्या नळीतून जन्म पावते' हे माओचे घोषवाक्य मान्य करून 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाने' सशस्त्र लढ्याची तयारी चालूच ठेवली आणि पी. रामनरसय्या व चंद्रपुला रेड्डी यांना अनुक्रमे वरंगळ व खम्मम या जिल्ह्यात सशस्त्र लढा संघटीत करण्यासाठी पाठवण्यात आले आणि श्रीकाकुलम येथे चारुमुझुमदार ग्रुप व वरंगळ, खम्मम आणि करीमनगर येथे नागीरेड्डी ग्रुप अशी विभागणी झाली. पी. रामनरसय्या व चंद्रपुला रेड्डी यांनी वरंगळ व खम्मम येथील एरीया कमिटीचे अधिकार हाती घेऊन 'गुरीला वॉर फेअर' करता फाइटींग स्क्वाडस् स्थापन करण्यास सुरुवात केली.

ऑल इंडिया को ऑर्डीनेशन कमिटीने फेब्रुवारी ६९ मध्ये भरलेल्या बैठकीत टी. नागीरेड्डी यांनी संसद सभासदत्वाचा राजीनामा दिला नसल्याचा व 'आंध्र को ऑर्डीनेशन कमिटी' खरी माओवादी, लेनिनवादी नसल्याचा आरोप केला. 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी' हे श्रीकाकुलम येथील गिरिजन चळवळीला केवळ तोंडदेखली सहानुभूती दाखवत असल्याचा दोष देऊन नागीरेड्डी ग्रुपची 'कम्युनिस्ट रेव्होल्यु-

शनरी' पार्टी आपल्या बरोबर नसून ती केवळ मित्र पक्ष आहे–Not Commrades but friends–असे जाहीर केले.

'ऑल इंडिया को ऑर्डीनेशन कमिटी'च्या या निर्णयावर विजयवाडा येथे भरलेल्या टी. नागीरेड्डी ग्रुपच्या बैठकीत फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात चर्चा होऊन त्यात वरील आरोपांचा इन्कार झाला व 'ऑल इंडिया को ऑर्डीनेशन' कमिटीचे हे वर्तन जनतेच्या सशस्त्र लढ्याला मारक ठरेल असा आरोप केला गेला. पुढे पुढे विजयवाडा हेच कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचे मुख्य केंद्र झाले. परंतु पोलिसांना अजूनही विजयवाडा येथील भूमिगत केंद्र सापडलेले नाही. माओ–लेनिन यांचे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ चर्चेतून नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळवावे व त्याकरता सर्व प्रांतात, देशात क्रांतिकारी कम्युनिस्ट गट संघटीत करावे असे ठरविण्यात आले.

११ मार्च ६९ ला टी. नागीरेड्डी यांनी विधानसभेचा राजीनामा दिला. राजीनामा देताना टी. नागीरेड्डी यांनी केलेल्या आपल्या निर्भीड प्रखर भाषणात म्हटले–

'गेली सोळा वर्षे या विधानसभेचा मी सदस्य आहे परंतु गेल्या सोळा वर्षात मी जनतेकरता काहीही करू शकलो नाही. कारण प्रस्थापित भांडवलदारी लोकशाही ही क्रांतिकारक कार्यक्रम अंमलात आणायला निरुपयोगी आहे. म्हणून मी माझ्या सदस्यत्वाचा राजीनामा देत असून जनतेच्या 'सशक्त क्रांतीची' तयारी करावयास बाहेर पडत आहे.'

टी. नागीरेड्डी विधानसभेचा राजीनामा देऊन बाहेर पडले आणि त्वरित त्यांना प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली काही काळ अटक करण्यात आली. आता 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी' पक्षाच्या हालचाली भूमिगतरीत्या होऊ लागल्या. पक्ष-बांधणीकरता त्वरित जिल्हावार समित्या नेमण्यात आल्या–अनंतपूरमध्ये नागीरेड्डी व इतर दोन, नलगोंडा जिल्ह्यात डी. वेंकटराव व इतर सात, वरंगळमध्ये शंकरराव व इतर चार, कृष्णा जिल्ह्यात चालपल्ली निवासराव व इतर चार, वेस्ट गोदावरी-मध्ये चौघे, खम्ममध्ये जी. वेंकटरामय्या व इतर सहा, ईस्ट गोदावरीमध्ये तिघे, गुंतूर येथे मडला नारायणस्वामी व इतर सात, नेल्लोर येथे जोना कोटाया व एन्. व्ही. कृष्णय्या, कर्नोल जिल्ह्यात चंद्रपुला रेड्डी व इतर तिघे, चित्तुर येथे इ. गोविंद नायडू व वज्रवेलु चेट्टी, श्रीकाकुलम येथे डी. कृष्णमूर्ती व एक, विशाखापट्टम येथे गोला नारायण, करीमनगर येथे दाटला वेंकटरामन राजू आणि हैद्राबाद येथे के. किशोर यांची नेमणूक करण्यात आली आणि कम्युनिस्ट क्रांतिकारकांची भक्कम भूमिगत संघटना उभी राहू लागली. खेडोपाडी लढे संघटीत करण्यात येऊ लागले. वरंगळ येथे तर मेडिकल कॉलेज, इंजिनियरींग कॉलेज म्हणजे क्रांतिकारकांचे अड्डेच बनले.

कृष्णा जिल्ह्यात तिरुवट तालुक्यात खंबबपाडू येथे 'अल्लु प्रगडा' या खेड्यात

'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी' यांची बैठक १०-११-१२ एप्रिल ६९ ला अत्यंत गुप्तरीत्या भरली. या महत्त्वपूर्ण गुप्त बैठकीत सशस्त्र लढयाचा मसुदा वाचला गेला व 'तातडीचा कार्यक्रम' अंगिकारण्यात आला. 'इमिजिएट प्रोग्राम'च्या पुस्तिका काढण्यात आल्या.

अशा रीतीने 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी पार्टीने' भांडवलदारी-सरंजामदारी भारत सरकारविरुद्ध आदिवासी - शेतकरी - कामकऱ्यांच्या दुसऱ्या मुक्तिसंग्रामाचे शिंग फुंकले.

वरंगळ-खम्मम-करीमनगर-अदीलाबाद-श्रीकाकुलम हा आंध्रच्या सरहद्दीवरचा व गोदावरीच्या खोऱ्याचा सर्व पट्टा कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या सशस्त्र उठावांनी पेटून उठला आहे. कम्युनिस्ट क्रांतिकारकांचे विचार काय आहेत? ते कशाप्रकारे लढत आहेत हे समजून घ्यायला प्रत्यक्ष क्रांतिक्षेत्रात जाणेच आवश्यक होते-

आंध्रमध्ये सरकारी एस. टी. नसून खाजगी बस सर्व्हीस आहे. परंतु या बस सर्व्हीसवर कडक सरकारी नियंत्रण असल्याने तिकीट दर व्यवस्थित असतात. मात्र कंडक्टर-ड्रायव्हर यांचे पगार-हाल हे अतुलनीय. कोठेही चांगले स्टँड व प्रवाशांच्या सुखसोयी नाहीत. पहाटेच्या अंधारात बसने हैद्राबाद शहर सोडले-समोर वरंगळच्य दिशेला तांबडं फुटलं होतं! (क्रमशः)

---

पुढील लेखांक : बुधवार दिनांक ९ सप्टेंबर अंकात

---


**पुरंदऱ्यांची दौलत**

**नऊ पेशवेकालीन कथा**

**ब. मो. पुरंदरे**

**किमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**



दुसऱ्यास तापवणारा व स्वतः तापणारा विश्वकर्मा आता अस्ताला निघाला होता. आईमागून जाणाऱ्या मुलाप्रमाणे त्यांची किरणे पेंगाळून नाहीशी झाली होती. दिवेलागण झाली होती. त्या खेड्यातले घराघरातले दिवे पेटत होते. चुली पेटू लागल्या होत्या. पण सुभानाच्या घरात अद्याप अंधारच होता.

आंब्याच्या झाडाची सावली अंधारात बुडाली होती. स्वतःचे स्वत्व ती हरवून बसली होती. झाडावरच्या घरट्यांत उबेत चोची मिटून पक्षी पडले होते. पोट भरल्यामुळे ते सुस्त पडले होते. आंब्याच्या झाडाखाली सुभाना आला. त्याने घराकडे पाहिले. जीवाच्या घरातली चिमणी दिसली. शेजारच्या भीमाच्या घरातला तारेला टांगलेल्या कंदीलाचा प्रकाश पार आब्बापर्यंत सूर मारून पुढे गेला होता. पण त्याच्या झोपड्यात दिव्याच्या प्रकाशाचा पत्ता नव्हता.

बैल गड्याच्या विश्वासावर

---

राजा महाजन

---



सोडून तो सडाच गावाकडं आला होता. वांग्याचं राहिलेलं वाफं पुरं करून बैल घेऊन घरी यायची ताकीद त्याने गड्याला दिली होती. पण समोर घराचं किवाड अंधारात

उभं बघून तो ते सारं विसरला. झरझर झाडाखालून तो पुढं आला.

जीवाची म्हातारी बाहेर पाट्यावर रस्स्यासाठी मसाला वाटाया आली होती. ती अंधारात पाय चाचपत होती. तेवढ्यात जीवाच्या पोरानं दिवली आणली आणि त्याच वेळी सुभाना आंगणात आला. जीवाच्या म्हातारीनं त्याला पाहिलं. त्यानं म्हातारीच्या चेहऱ्याकडं पाहिलं.

" काय म्हणतेस आजे ? का वरडत होतीस उगाच ?"

" वरडू नाही तर काय करूं ? हे न्हाई आता आपल्याच्यान सोसवत. हिरीचं पोट दुःखाय लागलंय, सारखी वराडतीया न्हवं ! तळमळतीया मगाचान ती ! " म्हातारी म्हणाली.

तसं सुभानाच्या पायातलं बळ संपल्यागत झालं. तो मटकन् खाली बसला.

सुभानाची आईच गावाचं सुईणपण क ीत होती. गावातील आडलेल्या बायांची सोडवणूक ती हलक्या हाताने करी. गेल्या सालीच ती गुदरली अन् हिरा पोटूशी राहिली. सुभानाच्या आईची भारी इच्छा होती की आपल्या हातून सुनेचं बाळंतपण करावं म्हणून, पण लगीन होऊन पाच साल सरलं तरी हिरा पोटूशी राहिना. त्याच्या आईला हिराविषयी काहीतरी वाटाय लागलं होतं. पोरीची आई घा लेकरांची माय आहे हे म्हातारीला सोयरीक जमवताना कळलं होतं. मग हे असं कशापायी ?

गावच्या अंबाबाईला ती नवस बोलली होती. पण म्हातारीचं सरलं. तिचे केले संवरलेले हात पोराचं प्त्रार हातानं जन्म घ्याया आसूकले होते. पण ती आस तशीच ठेवून म्हातारी चालती झाली. म्हातारीचं दिस पाणी होऊन महिना जातो न जातो तोच जीवाच्या म्हातारीला हिराचा संशाव आला. तिचा होरा खरा ठरला. जीवाची म्हातारी अजून मसाला वाटत होती. सुभाना अजून डोकं धरूंन जागीच बसला होता.

सुभाना उठ बाबा ! असं हात टाकून कसं चाललं ! बघ तिच्याकडं ! जा, म्या आलूच एवढ वाटून, असे म्हणून न रगडलेला कांदा अन् मिरच्या म्हातारीनं वरवंट्याच्या जवळ सरकवल्या आणि तिने नेट लावून रगडायला सुरुवात केली. सुभाना हलकेच उठला. किवाड ढकलून आत गेला.

" कोन ऽऽ ते ऽऽ"

' मी ऽऽ हाय ' सुभाना म्हणाला.

नवऱ्याचा आवाज हिरानं अंधारातून वळखला. ती उठण्याची धडपड करूं लागली. सुभानाने ओढलेल्या काडीच्या प्रकाशात त्याला ते दिसलं.

" उगी पडा " सुभाना म्हणाला.

" भाकर नको ! " ती.

" मरू दे ती भाकर, अदुगर आपल्या जीवाचं पघ ! त्यानं कोनाड्यातला

कंदील पेटवला. तिच्या जवळ जात तो म्हणाला, वाऱ्यानं झ्झला काय ?"

"व्हय !" हिरा म्हणाली.

हिराचा चेहरा अगदी ओढलेला दिसत होता. कळ आली की ती कासावीस होत होती. ओठ आत, दाताखाली दाबून ती कळ आतल्या आत सोसू लागली. सुभानाला काय करावे ते सुचेना. तो वेड्यासारखा हिराकडे पाहात राहिला.

किवाड वाजलं तसं दोघांच्या नजरा पाराकडे गेल्या. जीवाची म्हातारी अंधारात ठेचकाळत येत होती. कंदिलाचा प्रकाश थेट किवाडापर्यंत पोहचत नव्हता. म्हातारी आली तशी हिरा सावरून बसली.

"उठू नग माझे पोरी. तशीच गप पड."

म्हातारीनं हिराच्या पाठीवर हात फिरवला. तिच्या त्या स्पर्शाने हिराला केवढा धीर आला. तिला आपल्या आईची आठवण आली. ती असती तर आज अशी वेळ आली नसती. आई बी गेली अन् सासू बी गेली. सासूची आठवण येताच तिला पुन्हा एकदा गहिवरून आलं. त्यासरशी बराच वेळ न आलेली कळ आली अन् ती गुरागत वरडू लागली.

"धाकला अजून आला न्हाई वाटतं ? म्हातारीनं विचारलं."

"न्हाई, त्यानं एक काळजी ठेवली मागं" सुभाना.

"कालंच यावयाचा नव्हं !"

"व्हय ! पण अजून तेचा पत्याच नाही. सार एक कोस तर जायचं हुतं. पण आज सांज गेली तरी त्याचा–"

म्हातारी मध्येच म्हणाली, "पण, त्यानी पाठवाय नगं का ?"

ते बी खरं ! सोयऱ्याच काय ते ! सुभान उठला. त्याच्या पोटात भूक लागली होती. रोज रानातून आल्यावर तो हात-पाय धुऊन भिंतीला पाठ लावून सपय बसत. हिरा चुलीशी बाजरीच्या गरम गरम भाकरी शेकत असत. वैलावर जेवण गदगदत असे. तो जेवाय बसला की ती त्याला वाफा निघणारे कोरड्यास वाढी अन् गरम गरम भाकर त्याच्यापुढे करी. धाकला दीर गड्याबरोबर मागाहून येई. कधी तो मळ्यातच राही. सुभाना घाईघाईनं जेवून मग त्या दोघांची भाकरी घेऊन लागोलाग तुकडा खाल्ल्यावर निघे.

सुभानाने सय येताच चुलीकडे पाहिले. चुलीपुढच्या राखीत मांजर आपल्या पिलांना पाजीत डोळे मिटून पडली होती. जणू तिला ही कल्पना आली असावी की आज हिराची चूल जळणार नाही म्हणून ! चुलीकडे काही क्षण पाहून तो ओसरीवर येऊ लागला. सांगावा घेऊन गेलेला भाऊ अजून आला नव्हता. येळ हाय, वकूत आहे म्हणून एका कोसावरच बहीण दिली होती. पावण सोय जाजती असं त्याच्या आईच सांगण होतं. सरूला म्हणून एका कोसावरच दिलं होतं.

गाडीचा खच-खच आवाज येऊं लागला तसा सुभाना उठला. बाहेर आला.

गाडीचा मोहरा त्याचा घराकडेच होता. वाट पायाखालची असल्याने बैल घराच्या ओढीनं जरा जोरात येत होते.

"कोन रं त्यो ?" सुभानानं आवाज टाकला.

"मी हाय, धाकल्या भावाचा आवाज ऐकून सुभानाला बरे वाटले. बहिणीचं गाठोडे घेण्यासाठी सुभाना म्होरं झाला. धाकल्यानं कासरे फेकले आणि तो बैलाच्या मानेपाशी उभा राहून शिवळान दिलेले पेड काढू लागला. अंधारात दिसना. पण थोड्याच वेळात सुभानाच्या लक्षात आलं की गाडीत सरू नाही.

भावाला विचारायला जीभ शिवशिवत होती. पण तो बैलांना घेऊन गोठ्यात गेला होता. सुभाना जोत चढून घरात आला. जीवाच्या बायकुनं चार–पाच भाकरी त्यावर लसणाचे तांबडे तिखट, कांदा आणि एका भगुण्यात रस्सा आणून कोनाड्यात ठेवले. म्हातारी अजून बसली आहे.

"गाडी आली वाटतं !" म्हातारीनं विचारलं.

"व्हय," खिन्नपणे सुभाना म्हणाला.

"सरू बी आली ?"

"नाय !" सुभाना उद्‌गारला.

म्हातारी गप झाली. एवढ्यात धाकटा भाऊ बळी आत आला. नेहमी पाण्याचा तांब्या आल्या आल्या पुढे करी, पण आज त्यानेच हंड्यातून तांब्या भरून पाणी घतले.

"आये ऽऽ ए ऽऽ आये ! जीवाची हळी आली तशी म्हातारी उठली. सुभानाची भूक गेली होती. पण भावासंगं तो बसला. दोन कोर हिराला द्यावे असे त्याला वाटत होते. जेवताना भाऊ काही बोलला नाही. सुभानानं काही विचारलं नाही. पाण्याचा तांब्या एका एका दमात घशात लोटत बळी म्हणाला, "सरूचं काय खरं नाय !"

ते ऐकून सुभाना चमकला. त्याला वाटलं ही काय आणखी पैदा आली. "तिच्या जीवाला बरं आहे ना ?" तो बळीकडे पहात म्हणाला.

"तिला काय धाड बडवलीया ! बेस हाय म्हशीवानी !"

हे ऐकून सुभानास बरं वाटलं. म्हणजे त्याचं असं आहे की तिचा दाला तिला धाडाया तयार नव्हता. सासू धाडाया तयार झाली ती. पण सरीचा दाला भारी खडूस !" बळी म्हणाला.

सरूच्यापण मनात होतं, पण नवरा असा मुरदाड निघाला. त्याला ती काय करणार ? सरू आणि तिची सासू दोघी त्याच्याशी भांडल्या. पण तो आईला बी माराया धावला. मग सरूची काय पाड ! दोघी गप्प झाल्या. पण तो मळ्यात गेल्यावर त्यास शिव्या देत राहिल्या. बळीला ते सारं पाहून अन् ऐकून तिरमिरी आली होती. भनीनं वाढून आणलेले ताट बाजूला सारून तो तसाच निघून आला होता.

सुभानाने सर्व ऐकून घेतले. तो काही न बोलता हात धुऊन हलला.

रात्र वाढत होती. बैल गव्हाणीला रवंथ करून निपचीप पडले होते. बळी ओसरीवर पडला होता. जीवाची बायको व म्हातारी हिरापाशी बसून कंटाळल्या होत्या.

अजून तिची सुटका झाली नव्हती. त्यांना काळजी लागली होती. झोपेने डोळे तारवटले होते. हिराची तगमग त्यांना पहावत नव्हती. कळ आली की हिराचा जीव कंठाशी येई. तिला वरडायला सुदिक त्राण राहिला नव्हता. अंगात ताप पण चढू लागला होता. तिचे ओठ सुकले होते. ओटीपोटाला तडस लागली होती. पण हिरा मोकळी होत नव्हती.

सुभाना ओसरीवर पडला होता, पण कान मधल्या घरात लागलं होतं. एक आवाज आला की आपण मोकळं झालो असे त्यास वाटत होते. मधूनच हिराच्या कण्हण्याचा आवाज येई. ती ओरडू लागे. जीवाच्या म्हातारीचा किंवा बायकूचा समजूतीचा सूर ऐकू येई. आता कोंबडयानं भांग दिली. सुभाना काळजीनं ग्रासला होता. जीवाच्या बायकोने व म्हातारीने तर आशाच सोडली होती.

सुभाना उठला. त्यानं तोंड धुतलं. महादेवाच्या देवळासमोर येऊन त्यानं देवाला नमस्कार केला. कांबळयाच्या हॉटेलात तो आला. चांगलं दोन कप पेशल चाय तो प्याला. एवढयात कांबळे बोलला, " पाटील, पेढयाची आर्डर माझ्याकडं पाहिजे बरं का ! "

" तुझ्या तोंडात साखर पडो ! " सुभाना म्हणाला.

सुभाना घराकडं परत येत होता तोच त्यास समोरून येणारा बळी दिसला.

" दादा, वयनी बघा कसं कराया लागलीया. चला लवकर.

सुभाना व बळी पळतच घरात आले. ओसरीवर येताच माजघरात आणखी चार–दोन बाया जमा झाल्या होत्या. हिरा जोराजोरात ओरडत होती. सुभानास ते सहन होईना. तो आंब्याच्या झाडावर जाऊन बसला. हळू हळू तांबडं फुटू लागलं. घरातला गलका वाढत होता. क्षणाक्षणाला सुभानाचा धीर खचत होता. आता भीवा, राया, जीवापण सुभाना भोवती जमले होते.

एवढयात बळी पळत आला. " दादा, वयनीला मुलगा झालाय आणि एकदम गलका झाला.

" पाटील, पेढं द्या पेढं ! " सुभाना मात्र सुटलो या भावनेनं उठला. हिराची सुटका झाली होती. सर्वांच्या जीवात जीव आला होता.

सुभाना आत आला तशी हिरा उठण्याचा प्रयत्न करू लागली.


" गप रहा, कसं हाय आता ! " सुभाना म्हणाला.

" ठिक हाय् धनी ! " हिरा म्हणाली. तिच्या चेहऱ्यावर आता आनंद ओसांडत होता. सुभाना शांतपणानं हिरा व त्या नव्या जीवाकडं पहात होता.

खरंच धनी, सुटले बघा एकदाची, हिरा म्हणाली.

खरं हाय हिरा, तू बी सुटलीस अन् म्या बी सुटलो असं पुटपुटत सुभाना ओसरीवर आला. आंब्याच्या झाडावरचा थवा आकाशात एकदम उडाला. आता चांगलं उजाडलं होतं.

□ □ □



वसंत देशमुखांचे नाव माझ्या लक्षात राहिले आहे ते एक गाजावाजा झालेला लेखक म्हणून. मात्र हा गाजावाजा गुणी लेखक म्हणून नव्हे; तर आपण चांगली पन्नास एक पुस्तके लिहिणार आहो या घोषणेने शड्डू ठोकून उभा असलेला साहित्याच्या क्षेत्रातील एक पैलवान म्हणून.

# परमेश्वराच्या चुका

**तापदायक अनुभव**

**जयवंत चुनेकर**

केवळ संख्या हेच प्रसिद्धीचे किंवा लेखनाचे मूल्य मानले, तर काय होणार ? त्याचे प्रत्यंतर म्हणजे प्रस्तुतचे पुस्तक. लेखकाच्या पुस्तकसंख्येत भर घालणारे, इतकेच याचे महत्त्व. एरव्ही हे पुस्तक म्हणजे बालबुद्धीच्या वाचकांनाही रद्दड वाटणारे लिखाण.

परमेश्वराने निर्माण केलेले विविध प्राणी परमेश्वरापुढे आपली कैफियत मांडतात आणि आपली निर्मिती म्हणजे त्याची एक घोडचूक आहे, हे परमेश्वराला (लेखकाच्या भाषेत) पटवून देण्याचा प्रयत्न करतात.

प्राणी बोलू लागतात असे म्हटले खरे; पण हे वरवरचे विधान झाले. इथे प्राणी बोलतच नाहीत. बोलताहेत ते त्यांच्या मुखातून देशमुखच. ह्याची उदाहरणे पुस्तकात पानोपानी आहेत: 'स्कॉर्चेड् अर्थ पॉलिसी,' सॅबोटेज, बॅकग्राऊंड-मध्ये' (पृ. ४५), तसेच पृ. ५६ वरचा शेवटून दुसरा परिच्छेद. ह्यापेक्षा अधिक उदाहरणे देऊन जागा अडवायची गरज नाही. खरे तर हे सारेच लिखाण इतके प्राथमिक, शब्दबंबाळ आहे की त्यातून चांगले निवडायचे तरी काय हा प्रश्न

पडावा ! त्या शब्दबंबाळपणाची कितीतरी उदाहरणे बहुश: प्रत्येक लेखातून मिळतील म्हणून ती मुद्दाम दाखवायची गरज नाही. शब्दहव्यासूपणाने शाळेतल्या विद्यार्थ्यांनि उपमा-उत्प्रेक्षांचा पाऊस पाडावा, तसाच इथे सारा प्रकार आहे. कल्पनांच्या नावानेंही साराच आनंद आहे ! उपमांमध्ये कशी अंतर्गत विसंगती आहे, ते, पहिल्याच लेखातील अभिमन्यूची व मोराची तुलना केली आहे, त्यावरून लक्षात यावे. पृ ३० वर आलेली सश्यांच्या शुभ्रपणाविषयीचीही उपमाही अभद्रच आहे. या असल्या पोरकट हेतुतूनच 'कणामुळे रण माजणार आहे ! कणानेच रण करणार आहेत ! ' अशी शब्दबंबाळ वाक्ये उगीचच येत राहतात. 'वाघ म्हटला तरी–' मध्ये अखेरची वाघाच्या मनातील कल्पना निव्वळ हास्यास्पद आहे !

सगळ्या प्राण्यांच्या कैफियती ऐकल्यानंतर परमेश्वर साऱ्यांची समजूत काढतो. ('परमेश्वर उवाच !') एका वाक्यात जे सांगायचे ते सांगण्यासाठी दोन अडीच पाने खर्ची घालायचा उपद्व्याप कशाला करायचा ? पण सगळे पुस्तकच जिथे पोरकट लेखनानें भरगच्च आहे, तिथे हा लेख तरी त्याला अपवाद कसा ठरावा ?

ह्यातील विचार, एवढेच काय ह्यातील शब्दयोजना, वाक्यरचना हा साराच प्रकार वाचणे म्हणजे एक तापदायक अनुभव आहे. 'खुद्द माझी धर्मपत्नीही ... द्वेष पिसारते ! जळजळ चीत्कारतो (पृ. ९) असली शब्दरचना; 'खुंटाळीवर टांगलेलं सासुबाईंच्या अस्थींचे बोचकं ज्यावेळी, अवेळी सुटलेल्या वाऱ्यानं हिंदकळत असतं' (पृ. ३९), अशी अर्थहीन, शब्दांचा फापट पसारा वाढवणारी, 'अंगठी' शब्दावर पोरकट विनोद करणारी (पृ. ४४) रचना; 'पण...पण,' 'हाँ' असल्या फालतू शब्दांची कंटाळवाणी पुनरुक्ती; हा साराच प्रकार अत्यंत तापदायक होऊन केवळ ९४ पृष्ठांचे हे छोटखानी पुस्तक शेवटपर्यंत वाचणे हीच शिक्षा वाटू लागते; मग लिहिणे वाटेल हे वेगळे सांगायची गरज काय ? ◻

**परमेश्वराच्या चुका ! : वसंत देशमुख : चेतक पुस्तके, मुंबई : मूल्य २॥ रुपये.**

# अनुरक्ता

ज्या मराठी साहित्यात १९३९ साली 'रणांगण' सारखी कादंबरी लिहिली गेली त्या मराठीत १९७० साली एखादी चटकदार (! ?) गोष्ट सांगण्यासाठी कोणी श्री. प्रभाकर जोशी नामे लेखक कादंबरी लिहितो, आणि त्याला प्रकाशकही भेटतो, हे आश्चर्यकारक नव्हे काय ? केवळ अर्थापेक्षेने केलेले लिखाण म्हणावे तर किमान वाचनीयता निर्माण करणारी कारागिरी तरी यात असावी ? पण छे.

कोण्या एका वेश्येने पालन केलेल्या सुस्वरूप व सुस्वभावी मुलीची–अनुरक्तेची–संसारसुखाची (नेहमीची) इच्छा एक पटवर्धन नामे टेनिसपटू एक दिवस–एक

रात्र पुरी करतो. पुढे तो व्यापारी होतो. त्याचा मुलगा टेनिसपटु होऊन ज्या प्रति स्पर्ध्यासमोर उभा राहतो त्याची टेनिस खेळण्याची ढब अगदी स्वतःसारखी असल्याचा प्रत्यय पटवर्धनला येतो. त्याचे हास्य अनुरक्तेसारखे वाटते. नंतर (मराठी नाटक–चित्रपटांप्रमाणे) चामखीळाची खूण पटते. परंतु शेवटपर्यंत त्याची व त्याच्या माजी प्रेयसीची भेट होत नाही. संपली कादंबरी.

एकीकडे अनुरक्तेच्या समर्पणाला सोज्वळ बंगाली वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आहे तर दुसरीकडे तिच्या कोणकोणत्या वस्त्रप्रावरणातून कोणता शरीरभाग किती व कसा मादक दिसत होता याचे लघळपघळ वर्णन आहे. टेनिसपटु नायक असल्यामुळे चवीपुरते असलेले टेनिसचे वर्णन, 'अपघाता'वर आधारलेले कथानक आणि स्त्रीशरीरवर्णनाची हौस पाहता कोणते साहित्यिक आदर्श पुढे ठेवून ही कादंबरी लिहिली आहे, हे उघडच आहे.

प्रश्न इतकाच : अशा कादंबऱ्या वाचतो कोण ? अशी कादंबरी वाचण्यापेक्षा एखादा हिंदी चित्रपट का न पाहावा ?

— सौ. पुष्पा भावे

**अनुरक्ता : प्रभाकर मोरेश्वर जोशी : मेनका प्रकाशन, पुणे : किं. : साडेचार रुपये**

□

# पाच कवितासंग्रह

मराठीत स्फुट कविता पुष्कळ लिहिली जाते. 'कविता फार साठल्यामुळे तूर्त कवींनी आपल्या कविता पाठवू नयेत' अशी कळकळीची सूचना मराठी नियतकालिके पुन्हा पुन्हा करताना दिसतात. या स्फुट कवितांचे क्वचित संग्रह प्रकाशित होतात. अशा पाच कवितासंग्रहांची ओळख येथे करून देत आहे. हे पाचही संग्रह १९६८–६९ सालात प्रसिद्ध झाले आहेत. त्या त्या कवींचे हे पहिलेच संग्रह आहेत. अर्थातच हे कवी प्रसिद्ध वा प्रस्थापित नाहीत.

## काजवा

'काजवा' या कवितासंग्रहाचे कवी श्री. सुधाकर रा. सातोस्कर यांच्या कवितात प्रामुख्याने प्रेम आणि निसर्ग हे विषय आढळतात. मानवतेवरील श्रद्धा काही कवितांचा विषय झाली आहे; तर काही कवितातून काव्यनिर्मितीचा अनुभव व्यक्त करण्याचा प्रयत्न दिसतो. परंतु जाणवलेला अनुभव अंतर्मुख होऊन नीट

न्याहाळून नेमका व्यक्त करण्याची कसोशी या कवितात दिसत नाही.

त्याचे सहज प्रत्यंतर कवीने अनेक ठिकाणी योजलेल्या संगतिहीन प्रतिमातून येते. उदा. 'भेट' या कवितेतील आरंभीच्या चार ओळी पाहा:

अमृताच्या चांदण्याचे
ओघळले दारी लोट
किरणांच्या शिडीवर
दूर दूर एक वाट

किंवा 'कापत जावू दे सागराला' या कवितेतील 'काळाच्या कोळयाची मगरमिठी' ही ओळ पाहा.

श्री. सातोस्कर एकूण ज्या प्रतिमा योजतात त्या सरमिसळ असतात. त्यात 'ओला अंधार,' 'गुलाबी हव्यास', 'उकिडवे दुःख', 'गर्भरेशमी खांदा' यासारख्या असांकेतिक प्रतिमा जशा असतात तशाच 'प्रीतीचा कल्पवृक्ष', 'प्राणपंछी', 'खट्याळ वारा' अशा अतिसांकेतिक प्रतिमाही असतात.

असाच प्रकार एकंदर रचनेतही दिसतो. 'शिल्प' या कवितेत सुरुवातीला मादक स्त्रीसौंदर्याचे वर्णन येते; आणि शेवटच्या कडव्यात 'ते तर एक शिल्प होते' असा गौप्यस्फोट होतो. 'जीवनसाथी' या कवितेनंतर कंसात 'सिगारेटला उद्देशून' अशी मार्गदर्शक टीप जोडली आहे! चमत्कृतीच्या या हव्यासाबरोबर 'मातृछाया', 'कविता' 'मागायलाच विसरलो', 'त्या तिथे — पुलाखाली' यासारख्या काही अपवादात्मक कवितात काव्याशय खुलवणारा साधेपणा आढळतो.

या अशा सरमिसळीचे उघड कारण म्हणजे कवीला अजून स्वतःचा सूर सापडलेला नाही. ◻

## क्षणैक दिसली

क्षणैक दिसली' या श्री. राम-फकीर यांच्या कविता-संग्रहाच्या आरंभी असलेल्या निवेदनात म्हटले आहे, 'काव्य हा माझा प्रांत नाही, हे म्हणणेसुद्धा एकप्रकारची आत्मप्रौढी ठरेल. एवढे मात्र खरे की काव्य हा माझा व्यासंग नाही, काव्यरचनेचे माझे ज्ञान अगदीच तुटपुंजे आहे; दुसऱ्यांचे अनुकरण करून लिहिण्यापलीकडे माझी निर्मितिशक्ती गेलेली नाही.'

तरीदेखील हा कवी काव्यलेखनाला प्रवृत्त झाला याचे कारण त्याला भारतीय समाजाला काही सांगायचे आहे. 'क्षणैक दिसली' या प्रमुख, दीर्घ कवितेतून हा संदेश त्याने दिला आहे. या कवितेची कल्पना अशी : डोंगरभागात भ्रमंती करताना अचानक कवीला एक तारुण्याने मुसमुसलेली डोंगरयुवती दिसली. दर्शनाबरोबरच

डोंगरभागातील स्त्री-पुरुषसंबंधाचा व एकूण वन्यसंस्कृतीचा विचार मनात येतो. पाठोपाठ शहरी क्लीबसंस्कृतीचे व सनातन, (ब्रह्मचर्योपासक) त्याग संस्कृतीचे तौलनिक स्मरण होते. त्यातील एकाची निवड करण्याचे आवाहन देशबांधवांना करून त्यापुढे कवीने या तीनही संस्कृतींची चित्रे रेखाटली आहेत.

धावत्या पद्यपंक्तींमध्ये ही चित्रे रेखाटली आहेत. निवेदन वक्तृत्वपूर्ण आहे. पुनरुक्तीचा काही जागी प्रभावी उपयोग केला आहे. या संदर्भात काही पंक्ती सादर करणे योग्य होईल.

झुडुपे इथली शयनमंदिरे
झाडे, वेली सगेसोयरे
कुणी कुणा ना प्रश्न विचारी.

नारीनर नरनारी मधुनी
कथिण्या नर अन नारी कुठली
खूण लिंगता केवळ उरली

कवितेच्या अखेरीस आपला निर्णय देताना कवी म्हणतो,

'आज भारती प्रश्न अनेक ... ब्रह्मचर्य हे एकच उत्तर.'

ब्रह्मचर्याचा हा संदेश देण्यासाठी श्री. राम-फकीरांनी निबंधच का लिहिला नाही असे कोणालाही वाटेल. त्याला कवीचे उत्तर असे आहे की संचारित अवस्थेत कविता जशी स्फुरली तशी त्याने ती लिहिली आहे. त्या अवस्थेचे कविकृत वर्णन पुढीलप्रमाणे आहे: 'कविता लिहिताना कोणीतरी बाह्य शक्तीचा लेखनिक, डिक्टेशन घेणारा, एवढेच माझे स्थान असे वाटू लागले. ओळीमागून ओळी दर्वबिंदूप्रमाणे ठिपकू लागल्या, कडवी आपली घडण घडवू लागली, शहारे आणणारे शब्दप्रयोग पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे मनात उमटू लागले.'

'क्षणैक दिसली' या दीर्घ कवितेशिवाय संग्रहात अकरा स्फुट कविता आहेत. त्यातील एक श्रीमती इंदिरा गांधींवर, एक लालबहाद्दुर शास्त्रींवर तर एक वाढदिवसाच्या निमित्ताने श्री. राजाराम बापू पाटील यांच्यावर आहे! श्री. राजाराम बापू पाटील यांच्या कवितेतील पुढील तीन ओळी सादर केल्या नसत्या तर प्रस्तुत अभिप्रायाच्या वाचकांची वंचना झाली असती. त्या तीन ओळी अशा:

तुझ्या स्मिताला नाही उपमा
मानव-तनुधर जणू चंद्रमा
कोण कुणा उपमान.

'क्षणैक दिसली' या काव्यसंग्रहाच्या प्रतीबरोबरच प्रो० श्री. के. क्षीरसागर यांचा अभिप्राय टाचलेला आहे. त्यात ते म्हणतात, "काव्य हे श्री. राम फकीर यांचे माध्यम नव्हे, हे या छोट्या संग्रहावरूनही दिसून येईल." ◻

## पदाती

'पदाती' या काव्यसंग्रहाचे कवी श्री. ना. मा. सरपटवार कौटुंबिक सुखदु:खात रमणारे, त्यांनी प्रमुदित–व्यथित होणारे आणि त्यांची प्रामाणिक चित्रे रेखाटणारे कवी आहेत. क्वचित काव्यप्रपंचावर आणि केशवसुत, रवींद्रनाथ, लोकमान्य या महात्म्यांवर लिहिलेल्या कविता आढळतात; पण त्या अपवादात्मक.

असा काव्याशय मराठी वाचकांना अपरिचित नाही. अशा काव्याशयाशी विशिष्ट काव्याविष्कारपद्धतीचे नातेही त्याने जोडले आहे. 'पदाती' या काव्यसंग्रहातही हे नाते आढळते. षडाक्षरी–अष्टाक्षरी छंद, पादाकुलक जाती, शार्दूलविक्रीडित वृत्त असे रचनाबंध कवीने नेटकेपणाने योजले आहेत. या सांकेतिक आशय–आविष्कारपद्धतीशी संवादी अशी सांकेतिक प्रतिमायोजना आणि शब्दकळा, या काव्यसंग्रहात आढळतात. उदाहरणादाखल ध्येयाचा ध्रुव, भावगुलाब, जीवविहग, सुखदुग्ध, मत्सरविष या प्रतिमा पाहाव्या.

या कविता साध्या आहेत. आणि साधेपणातही काही सौंदर्य आणि आकर्षकता असते हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. या कवितासंग्रहातील एक साधी पण स्मरणीय कविता वाचकांसाठी मुद्दाम पुढे सादर करत आहे :

— आता —

संध्या आणि उषा, आवडल्या तेव्हा
अनंत निलिमा, आता रुचे!
निर्झरनिनाद आवडला तेव्हा
सागरसंगीत आता रुचे
पर्वती पाहून विसावलो तेव्हा
आता हिमनग ओढी मन
लावणीचे तेव्हा लावण्य रुचले
आता अभंगाचे वेड जीवा. ◻

## प्राजक्ताची फुले

श्रीमती लक्ष्मीबाई पटवर्धन यांचा 'प्राजक्ताची फुले' हा कवितासंग्रहदेखील त्यातील साध्या, भावपूर्ण, अकृत्रिम कवितांमुळे वाचनीय झाला आहे. कौटुंबिक भावविश्वाची मोठी हृद्य चित्रे लक्ष्मीबाईंनी रेखाटली आहेत. त्यात पुन्हा कवयित्रीची रचना सुबक आणि बहुधा निर्दोष; त्यामुळे लक्ष वेधून घेणारी काही रम्य स्थळे या संग्रहात सहज आढळतात. उदाहरणार्थ 'तिन्ही अवस्थात !' या कवितेतील प्रेमस्मरणाचे चित्रण पाहा :

असो कुठेही कशीही नेत्र मिटता एकांत
हितगुज करीते मी सख्या तुझ्याशी निवांत

किंवा ' एकाकी ! ' या कवितेतील पुढील साधी, हृदयस्पर्शी ओळ पाहा :

देणे घेणे सरले सारे काहि न उरली थकबाकी

' भावांजलि ! ' या उघडच प्रतीकात्मक असलेल्या कवितेत कवयित्रीने आपल्या काव्याचे नेमके वर्णन केले आहे. ती म्हणते :

माझ्यापाशी मात्र प्राजक्ताची फुले
अति सुकुमार सौम्य परिमळे. □

## शेकोटी

' शेकोटी ' या कवितासंग्रहाचे कवी श्री. प्रभाकरपंत पटवर्धन ध्येयवादी राजकीय कार्यकर्ते आहेत. कवितालेखन हे त्यांचे ' मनोविनोदाचे एक साधन ' आहे; ' स्वान्तःसुखाय केलेली रिकामपणची कामगिरी ' आहे. असे असले तरी त्यांच्या कवितांमध्ये त्यांच्या ध्येयदर्शी, आदर्शपूजक व्यक्तिमत्त्वाचे स्पष्ट प्रतिबिंब पडले आहे.

त्यांच्या कवितात हा आदर्श सुगंधरूप होऊन अवतरतो. अनेक कवितात या सुगंधाने भारावलेल्या कविवृत्तीचे दर्शन घडते. " प्रेमळपणा नि बुद्धिमत्ता, समजूतदारपणा नि परिश्रमशीलता असे चतुरंग स्वरूप आहे माझ्या सुगंधाचे " असे त्या सुगंधाचे वर्णन खुद्द कवीने प्रस्तावनेत केले आहे. या सुगंधाचे स्तवन करणारी अनेक गीते साहजिकच या कवितासंग्रहात आहेत. ' प्रकाश ' ' सुखाचा शोध ', यासारख्या कवितातून क्वचित उपहासाचा आश्रय कवीने केला आहे.

या संग्रहातील अधिकांश रचना गेय भावगीतांच्या स्वरूपाची आहे. अशा रचनेला आवश्यक असणारे रचनाप्रभुत्व कवीजवळ आहे.


असे हे पाच कवितासंग्रह. त्यांचे सूत्ररूपाने वर्णन करायचे झाल्यास असे करता येईल की हे संग्रह गेल्या दोन–तीन वर्षात प्रसिद्ध झाले असले तरी ' नवे ' नाहीत.

— अनन्त भावे

---

काजवा : सुधाकर रा. सातोस्कर : उषा प्रकाशन : ३ रु.
क्षणैक दिसली : राम–फकीर : अद्वैत प्रकाशन, सांगली : १–५० रु.
पदाती : ना. मा. सरपटवार : विदर्भ साहित्य संघ, प्रकाशन : ३ रु.
प्राजक्ताची फुले : लक्ष्मीबाई पटवर्धन : ३ रु.
शेकोटी : प्रभाकरपंत पटवर्धन : ज्ञा. गो. खानोलकर, श्रीराजमुद्रा, मुंबई : ३ रु.

दत्तप्रसाद दाभोळकर



# सूर्यमंडळ भेदिले

तुमची पंचांगे एकदा नीट तपासा. फक्त १७९ वर्षातून एकदाच येणारी एक महापर्वणी १९७७ साली येते आहे ! त्या वर्षी मंगळ, नेपच्यून, गुरू आणि शनी हे ग्रह पृथ्वीपासून एका सरळ रेषेत येतील. या ग्रहस्थितीचा एक व्यावहारीक फायदा होईल ! कमी तिकिटात लांबचा प्रवास घडविणारे एखादे 'झोन तिकीट' त्या वर्षी काढता येईल ! एखाद्या भाग्यवान अपोलोला हे तिकीट बहाल करण्यात येईल. फक्त गुरूवर जाण्यासाठी जेवढे इंधन लागते तेवढ्या इंधनात या चार ग्रहांचा प्रवास या अपोलोला उरकता येईल.

पण शास्त्रज्ञांच्या दृष्टीनें या असल्या बातम्यात काही दम उरलेला नाही. कारण शास्त्रीय भाषेत ज्या क्षणी मानव चंद्रावर उतरला त्याच क्षणी मानवाने सूर्यमाला जिंकलेली आहे.–चंद्रावर उतरण्यासाठी जेवढा वेळ, पैसा व श्रम खर्च केले त्याला काही दशकांनी गुणले की सूर्यमालेतील बाकीचे ग्रह हातात येतात. खरा प्रश्न आहे तो आपली सूर्यमाला भेदण्याचा. सूर्यमालेच्या पलीकडील ताऱ्यांवर आणि ग्रहांवर जाऊन पोचण्याचा. हे काम वरवर पाहता अशक्य वाटते. कारण सूर्यमालेच्या पलीकडील ग्रह आपल्यापासून महाप्रचंड अंतरावर आहेत. हे अंतर मोजण्यासाठीच आपण मुळी 'प्रकाशवर्ष' हा नवा शब्द वापरतो. प्रकाशकिरण सेकंदाला १ लाख ८७ हजार मैल एवढ्या प्रचंड गतीने प्रवास करतात. या गतीने प्रवास करणारे प्रकाशकिरण एका वर्षात जेवढा प्रवास करतात त्या अतिप्रचंड अंतराला आपण प्रकाशवर्ष म्हणतो. आणि सूर्यमालेबाहेरचे ग्रह आपणापासून शेकडो प्रकाशवर्ष अंतरावर आहेत. त्यातून आपल्या प्रवासाच्या वेगाला एक लक्ष्मणरेषा आहे. प्रकाशाच्या वेगापेक्षा अधिक वेगाने प्रवास करणे कोणालाही अशक्य आहे असे आईनस्टाइन म्हणतो. वेगाची ही लक्ष्मणरेषा आपण ओलांडू शकत नाही. म्हणजे थोडक्यात जिवंतपणी एखादा माणूस सूर्यमालेबाहेरच्या ग्रहावर जाऊन पोंचण्याची शक्यताच नाहीशी होते. पण काही अमेरिकन शास्त्रज्ञांनी याबाबत एक वेगळाच अंदाज व्यक्त केलाय. ते म्हणतात, 'सूर्यमालेबाहेरील ग्रहांच्यावर जिवंतपणे जाऊन पोचणे मानवाला सहज शक्य आहे. आईस्टाईननेच मुळी असं सांगितलंय ! आईनस्टाईनच्या सिद्धांतात एक ग्यानबाची मेख आहे !

कोणत्याही गोष्टीचा वेग सापेक्ष असतो हे आपण जाणतो. हा वेग पाहणाऱ्याच्या गतीवर आणि स्थितीवर अवलंबून असतो. समजा आपण रेल्वेतून प्रवास करीत आहोत. शेजारच्या रुळावरून, आपल्या रेल्वेच्या दिशेने तेवढ्याच वेगात एक रेल्वे जाते आहे. आपणाला शेजारची रेल्वे स्थिर आहे असे वाटते. पण या सापेक्ष वेगालाही एक मर्यादा आहे. प्रकाशाचा वेग सापेक्ष नसतो. तो पाहणाऱ्याच्या स्थितीवर आणि गतीवर अवलंबून नसतो. प्रकाशाचा वेग सेकंदाला १,८७ हजार मैल असा स्थिर असतो. एकमेकाभोवती गिरक्या मारणाऱ्या जुळ्या ताऱ्यांच्या (Double stars) अभ्यासावरून ही गोष्ट उघड होते. पृथ्वीकडे झेपावणाऱ्या आणि पृथ्वीपासून दूर पळणाऱ्या ताऱ्यांच्या प्रकाशाचा वेगही एकच असतो. कारण प्रकाशाचा वेग मुळी सापेक्ष नसतोच. आता आईनस्टाईनने सांगितलेली आणखी एक विलक्षण गोष्ट लक्षात घेऊ. आपण मोजण्यासाठी जी फूटपट्टी वापरतो तिची लांबी कायम असते असे आपण मानतो. माझ्या टेबलावरील फूटपट्टी काल मोठी झाली होती आणि उद्या ती लहान होईल असले विधान कोणी करू शकत नाही. तसेच एखादे यांत्रिक दृष्ट्या तंदुरुस्त असलेले घड्याळ कारण नसताना आपला वेग बदलू शकत नाही, पण आईनस्टाईनच्या मते या दोन्ही विधानांना एक मर्यादा आहे. एखादी वस्तू जर फार प्रचंड गतीने प्रवास करू लागली तर गतीच्या दिशेने तिची लांबी कमी होऊ लागते. घड्याळाचा वेगही मंदावू लागतो. ही गोष्ट एवढ्या अत्यल्प प्रमाणात होते की ती आपणाला जाणवूच शकत नाही. पण ज्या वेळी त्या वस्तूचा वेग प्रचंड प्रमाणात वाढतो, प्रकाशाच्या वेगाच्या लक्ष्मणरेषे-जवळ तो वेग जाऊन पोचतो त्यावेळी या गोष्टी आपणाला जाणवतात. त्यावेळी आपण स्थिर असल्यास आपल्या दृष्टीने फूटपट्टीची लांबी कमी झालेली असते. घड्याळ कमी वेगाने धावत असते. मात्र जो माणूस त्यावेळी पट्टी व घड्याळ यांच्या वेगानेच धावत असेल त्याच्या दृष्टीने पट्टीच्या लांबीत वा घड्याळाच्या वेगात फरक पडलेला नसेल. आपण अधिक स्पष्ट उदाहरण घेऊ. एखादी तीन फूट लांबीची पट्टी जर सेकंदाला १,६७,००० मैल या गतीने प्रवास करू लागली तर तिची लांबी फक्त दीड फूट बनेल. या गतीने जाणारे घड्याळ चार दिवसात एक फेरी पुरी करेल. आणि ज्यावेळी पट्टीचा वेग प्रकाशाच्या वेगाएवढा होईल त्यावेळी तर ती पट्टी नाहीशीच होईल. कोणतीही वस्तू प्रकाशाचा वेग का घेणार नाही याचे हेही एक कारण आहे. कारण त्यावेळी ती वस्तूच अस्तित्वात नसेल !

आज शरीरशास्त्रज्ञ आपणाला आणखी एक गोष्ट सांगतात. मानवी शरीर हे एक घड्याळ आहे. मेंदू, हृदय आणि शरीरातील इतर असंख्य पेशी कोणत्यातरी जीवशास्त्रीय तालावर काम करीत असतात. आता एखादा माणूस सेकंदाला दीड लाख मैल असल्या प्रचंड गतीने प्रवास करू लागला तर हा ताल कमी होईल. त्या माणसाच्या शरीरात घडणाऱ्या अनंत क्रिया सावकाश घडतील. त्यामुळे त्या


माणसाचे वय सावकश वाढेल. समजा सेकंदाला एक लाख साठ हजार मैल या वेगाने वीस प्रकाशवर्षं अंतरावरील ग्रहावर जाण्यासाठी पंचवीस] वर्षे वयाचा एक अंतराळवीर निघाला आहे. त्या ग्रहावर पोचावयास व परत| यावयास त्याला पन्नास वर्षे लागली म्हणजे तो ज्यावेळी परत येईल त्यावेळी त्याची तेवीस वर्षांची बायको श्याहत्तर वर्षांची म्हातारी असेल. त्याचा तीन वर्षांचा मुलगा त्रेपन्न वर्षांचा बनलेला असेल. पण त्यावेळी त्या अंतराळवीराचे वय मात्र फक्त दोन वर्षांनी वाढलेले असेल. तो असेल फक्त सत्तावीस वर्षांचा !

मानव सूर्यमाला भेदून बाहेर जाईल का नाही हा आपला मूळ प्रश्न अजून अनुत्तरीतच आहे. पण जेव्हा केव्हा हा प्रवास घडेल त्यावेळी, त्याला मानवी जीवनाच्या कालखंडाची मर्यादा पडणार नाही हे मात्र आज अनेकांना मान्य आहे. कारण जीवशास्त्रीय गणिताप्रमाणे प्रकाशाच्या वेगाच्या अठ्ठ्याण्णव टक्के वेग जरी एखाद्या अंतराळवीराला आपण देऊ शकलो, तरी वीस हजार प्रकाशवर्षे अंतरावरील ग्रहावर जाऊन यावयास त्या अंतराळवीराला त्याच्या आयुष्यातील फक्त पंधरा वर्षे खर्च करावी लागतील. ◻

## अमेरिकन विद्यापीठात....

भारतात विद्यापीठातले विद्यार्थी काय वाटेल ते करतात. विद्यापीठाच्या आवारात ते दगड मारतात, दंगल करतात. वर्गात बसून ते बाण मारतात, शिट्या मारतात, प्रेम करतात, जमलं तर थोडाफार अभ्याससुद्धा करतात ! पण ही कहाणी आहे अमेरिकेतली. अमेरिकेतल्या पिट्सबर्ग विद्यापीठातले विद्यार्थी अभिनव शास्त्रीय गोष्ट करीत असतात. ते विद्यार्थी वर्गात बसून अभ्यास करीत असतात आणि त्याचवेळी त्यांच्या शरीरातूनन बाहेर पडणारी उष्णता त्यांच्या वसतीगृहाला पुरवत असतात. हिवाळ्यात रात्री पिट्सबर्गचे तपमान शून्याखाली दहा अंश इतके खाली येते. पण त्यावेळी वसतीगृहात गरम हवा खेळवण्यासाठी विद्युत शेगडी वापरावी लागत नाही. दिवसा वर्गात विद्यार्थ्यांच्या अंगातून बाहेर पडलेली उष्णता हे काम करून जाते. विद्यापीठाच्या आवारात विद्यार्थ्यांनी बसविलेल्या अत्याधुनिक विद्युत तपमान नियंत्रकामुळे हे शक्य झालंय.


पिट्सबर्ग विद्यापीठातील हा तपमान नियंत्रक खालील सोप्या तत्त्वावर काम करतोय. (१) हा त्या विद्यापीठात मध्यवर्ती बसवलेला हौद आहे. दोनशे टन वजनाचे मशीन त्या हौदातले पाणी ४२° फॅ. इतके गार बनवते. हे गार पाणी आकृतीत दाखविलेल्या टिबा टिबाच्या रेषेच्या मार्गांनी वर्गात बसविलेल्या (२) या शीत यंत्रात जाते. हे थंड पाणी विद्यार्थ्यांच्या शरीरातून व दिव्यातून बाहेर पडणारी




तपमान नियंत्रक

वर्गातील उष्णता शोषून घेते. थोडक्यात एखाद्या शीत खोली [ Air Conditioned Room ]प्रमाणे वर्गाचे तपमान खाली येते. त्याच वेळी ही उष्णता शोषून हे पाणी गरम झालेले असते. हे गरम पाणी आकृतीत दाखविलेल्या एकसंध रेषेच्या मार्गानी (१) च्या वरील बाजूस बसविलेल्या हौदात येते. हे गरम पाणी (३) या हौदात साठवून ठेवतात. रात्रीच्या वेळी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहातील खोल्यांमधून (४) हे पाणी खेळवले जाते. हे गरम पाणी वसतीगृहातील खोल्यांमध्ये उष्णता सोडून खोल्यांचे तपमान वाढवते. उष्णता खोलीत सोडल्यामुळे गार बनलेले हे पाणी आकृतीत दाखविलेल्या टिंबा टिंबाच्या रेषेनी पुन्हा (१) मध्ये येते. पिट्सबर्गच्या वसतीगृहात एकूण तीनशे एकसष्ट विद्यार्थी राहतात. त्या विद्यार्थ्यांना नळामधून १३०° फॅ. चे गरम पाणी पुरविण्यात येते. दहा हजार गॅलन गरम पाण्याचा साठा करू शकतील अशा दोन भल्या मोठ्या टाक्या विद्यापीठात उभारलेल्या आहेत. शनिवार-रविवार वा इतर सुट्ट्यांच्या दिवशी प्रयोगशाळा व वर्ग बंद असतात त्या दिवशी हे साठवलेले पाणी वसतीगृहातील तपमान नियंत्रित करण्यासाठी वापरले जाते.

या साऱ्या योजनेची आखणी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी केलेली आहे. या साऱ्या योजनेचे नियंत्रण विद्यापीठातील विद्यार्थी करतात. पिटसबर्ग विद्यापीठातील कुलगुरूंच्या मते या योजनेत खरोखरच काही तसे फार नवे आहे का ? ही योजना आर्थिक दृष्ट्या फायद्याची आहे का ? हे मुद्दे फारसे महत्त्वाचे नाहीत. विद्यापीठातील सारे विद्यार्थी एकत्र येऊन काही नवे प्रयोग करताहेत. त्या प्रयोगाच्या धुंदीत



**पिट्सबर्ग विद्यापीठातील एक विद्यार्थी पाण्याच्या टाकीची तपासणी करताना.**

ते विद्यार्थी मग्न आहेत हे अधिक महत्त्वाचे आहे. कारण कोणत्याही देशातील विद्यापीठे ही त्या देशाची खरी शक्तिस्थाने असतात. 'कालचा' अभिमान बाळगणारे आणि 'उद्याचा' संकल्प सोडणारे राष्ट्राचे सामर्थ्य अखेर विद्यापीठात असते. त्या विद्यार्थ्यांनी वाहवू नये, दंगल करू नये असे वाटत असेल, तर त्या विद्यार्थ्यांना गुंतवून आणि गुंगवून ठेवतील असे नवे शास्त्रीय प्रयोग त्या विद्यार्थ्यांच्या समोर ठेवावे लागतात. ◻ ◻ ◻

---

बत्तीस शिराळ्याची दैवी नागपंचमी हे एक थोतांड आहे असेच विज्ञानेश्वरीचे मत आहे. सुप्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ डॉ. देवरस यांनी यावर्षी केलेल्या संशोधनातून ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. पण डॉ. देवरस यांच्या संशोधनानंतर आणखीही काही प्रश्न निर्माण होतात. बत्तीस शिराळ्याला दर वर्षी होणाऱ्या प्रयोगामुळे नागजातीच्या आजवरच्या अभ्यासात न सुटलेली काही कोडी सुटतात का? – आजवर ज्ञात असलेल्या अभ्यासाला अनाकलनीय वाटावी अशी काही गूढ माहिती हातात येते का?

हा दृष्टिकोन समोर ठेवून विज्ञानेश्वरी डॉ. देवरस यांची एक विस्तृत मुलाखत प्रसिद्ध करणार आहे. या दृष्टिकोनातून मुलाखतीच्या वेळी जे प्रश्न डॉ. देवरस यांना विचारले जावेत असे आपणाला वाटत असेल ते प्रश्न आपण १० सप्टेंबरपूर्वी 'माणूस'ला कळविल्यास मुलाखत परिपूर्ण होण्यास मदत होईल. कदाचित आपला प्रश्न महत्त्वाची कामगिरी बजावून जाईल.

---

## उर्दू रंगभूमीवरील नवे स्वप्न

# अझर का ख्वाब


**अनिल हवालदार**

जॉर्ज बर्नार्ड शॉ यांचे पिग्मॅलियन नाटक माय फेअर लेडी या नावाने अलीकडेच रजतपटावर अवतरले आणि रोमन हॉलीडेची नायिका ऑड्री हेपबर्न पुन्हा एकदा गाजली. रेक्स हॅरिसन या नटाचा सुरेख अभिनय पहायला मिळाला आणि मुंबापुरीतल्या कॉन्व्हेंट छात्रगणांमध्ये म्युझिक खूपच पॉप्युलर झाले.

बेगम कुद्सिया झैदी यांनी पिग्मॅलियनला उर्दू नाटयरूप देताना अझर बनविले. प्राचीन ग्रीक दंतकथेमधील पिग्मॅलियन हा शिल्पकार त्याने स्वत: तयार केलेल्या पुतळ्याच्या प्रेमात पडायचा. बेगम झैदी यांनी अझर हे पुरातन अरब शिल्पकाराचे नाव प्रस्तुत नाटकासाठी उचलले. हा अझर आपल्या स्वप्नातली सुंदरी साकार करण्यासाठी सतत एकामागून एक पुतळे घडवीत होता. हे नावाचे साधर्म्य इथेच संपले आहे आणि इंडियन पीपल्स थिएटरने नुकतेच सादर केलेले अझर का ख्वाब हे उर्दू नाटक म्हणजे माय फेअर लेडीला पुन्हा दिलेले नाटयरूप.

अझर का ख्वाब पहात असताना माय फेअर लेडीची आठवण येणे साहजिक होते. नितीन सेठी यांचा अझर पाहताना रेक्स हॅरिसनचा प्रोफेसर हिगिन्स नजरेसमोर येत होता आणि देवयानीची हज्जो पाहताना ऑड्री हेपबर्नची एलिसा डूलिटल दिसत होती. अर्थात या ठिकाणी तुलना करण्याचा प्रश्न नाही. परंतु त्या गाजलेल्या कलाकृतीची आठवण अपरिहार्य होती.

पडदा उघडला आणि अवधी भाषेचा भडिमार करीत अझर का ख्वाबची नायिका हज्जो रंगमंचावर अवतरली. उर्दू रूपांतर करताना लेखिकेने या बोलीचा मोठा कुशल वापर केला आहे. हज्जोची भूमिका देवयानी या अभिनेत्रीने फार



साधना खोटे । ए. के. हनगल

सुरेख वठवली. तिचे दर्शन आकर्षक आहे. नायिकेचा पहिला रांगडा स्वभाव आणि नंतर बेगम बनल्यानंतरचे तिचे वागणे यामधील अभिनयाची वाटचाल आनंददायी होती. मात्र चुकीच्या प्रकाशयोजनेने तिचा शेवटचा दुःखाभिनय प्रभावी वठू शकला नाही. उर्दू रंगभूमीला मिळालेली ही ऑड्री हेप्बर्न मूळची उर्दू भाषिक नाही असे समजले.

असाच सहजसुंदर अभिनयाचा आनंद अझरच्या बहिणीचे काम करणाऱ्या साधना खोटे या अभिनेत्रीने दिला. स्वच्छ, सुंदर धारदार आवाजातील तिचे उर्दू संवाद ऐकणे हा एक आनंद होता. सुप्रसिद्ध चित्रपटतारका मीनाकुमारीच्या संवाद बोलण्याच्या ढंगाचे साधर्म्य या अभिनेत्रीच्या ठायी आहे आणि उर्दू तिचीही मातृभाषा नाही हे विशेष. खुर्शिदची छोटीशी भूमिका करणारी सुलभा आर्य ही मराठी अभिनेत्रीही छान उर्दू बोलून गेली. तिने रंगभूषेकडे मात्र ज़रा लक्ष देणे आवश्यक आहे.

नाटकाचा नायक पिग्मॅलियन ऊर्फ प्रोफेसर हिगिन्स ऊर्फ अझरची भूमिका नितीन सेठी या उमदे व्यक्तिमत्त्व असलेल्या नटाने केली. त्यांचा अभिनय संयत आहे आणि त्यांच्या भोवतालच्या नटांच्या उर्दू परंपरेतील भडक अभिनयाच्या पार्श्वभूमीवर तो अधिकच उठून दिसतो. ए. के. हनगल यांनी हिगिन्सबरोबर पैज मारणाऱ्या माणसाची–फरहत उल्लाची भूमिका वास्तववादी अभिनयाने सचेतन केली.

नायिकेच्या बापाची भूमिका करणाऱ्या माणसाने चार हशे घेतले तरी एकूण अभिनय हिंदी चित्रपटातल्या धाटणीचा. तो आरडाओरडा ऐकून कानाचे पडदे फाटायची वेळ आली. दिग्दर्शक आर. एम्. सिंग यांनी संपूर्ण नाटक नेटके बसविले आहे ही गोष्ट खरी. परंतु हिंदी चित्रपटातील 'कॉमेडी' नामक भयानक गोष्टीचा सोस त्यांनी सोडला तर 'इप्टा'तर्फे निघणारी नाटके अधिक सुसह्य होतील. गेल्या दोन वर्षात 'इप्टा'तर्फे निघालेली हिंदी-उर्दू नाटके पाहताना बराच मनस्ताप झाला होता. छाया-प्रकाशाचे जादूचे खेळ, चित्रपटतंत्राचा फाजील वापर आणि नाटकाच्या नावाने शून्य अशा रटाळ निर्मिती, एकेकाळी नाट्यक्षेत्रात पुरोगामी म्हणून गाजलेल्या 'इप्टानें' केलेल्या पाहण्याचा प्रसंग मध्यंतरीच्या काळात आला होता. वस्तुतः बलराज सहानी, परीक्षित सहानी, नितीन सेठी, ए. के. हनगल, देवयानी यांच्यासारखी अभिनयकुशल मंडळी 'इप्टा'च्या पदरी आहेत. 'अझर का ख्वाब'ने पुन्हा आशादायी परिस्थिती निर्माण केली आहे. या नाटकाच्या मोठेपणाचा जेवढा गाजावाजा ऐकला तेवढे हे नाटक आवडले नाही हे प्रांजळपणे सांगितले पाहिजे. परंतु आजवर नजरेला पडलेल्या हिंदी-उर्दू नाटकां-मध्ये हे खूप उजवे भासले. अलीकडे त्या सत्यदेव दुबे यांनी हिंदी रंगभूमीवर तर नवी क्रांतिकारक परंपरा निर्माण केली आहे. त्याची दखल 'इप्टा'च्या लेखक-दिग्दर्शकांनी जरूर घ्यावी.

'प्रीती परी तुजवरती'चे आल्हादक नेपथ्य करणाऱ्या एम्. एस्. सत्यू यांनी 'अझर का ख्वाब'मध्ये नेपथ्याबाबत निराशा केली. शमा झैदी यांची भूमिका नगण्य असली, तरी त्यांनी बनविलेले पोषाख मात्र सुरेख होते.

□ □ □

---

## श्रान्त हात !

महाग्यानी पंडित रविशंकर यांचा, श्रोत्यांना धुंद करणारा सतार वादनाचा कार्यक्रम नुकताच संपला. श्रोत्यांना अभिवादन करून पंडित रविशंकर रंगमंचाच्या आतील खोलीत गेले. पाहतात तर त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठी कितीतरी जागती मुले व मुली उभ्या आहेत.

श्रान्त झालेले पण्डितजी हिंदीत म्हणाले, "माझे हात अगदी थकून गेले आहेत. आता स्वाक्षरी देण्याचा मला आग्रह करू नका."

त्यावर एक धीट मुलगी पुढे येऊन म्हणाली, माफ करा. पण्डितजी, आपल्या हाताइतकेच आमचेही हात थकून गेले आहेत; आपल्या प्रत्येक सुरावटीला दाद देऊन—टाळ्या वाजवून !'

पण्डितजींनी स्मित केले आणि स्वाक्षरी देण्यास सुरुवात केली !

---

# रंगभूमि

शरद गोखले

## नव्या साजात उद्याचा संसार

अत्रे थिएटर्स या नाटयसंस्थेने आचार्य अत्रे यांची गाजलेली नाटके पुन्हा रंगभूमीवर आणण्यास सुरुवात केली आहे. प्राणिग्रहण नंतर आता उद्याचा संसार डॉ. लागू यांच्या दिग्दर्शनाखाली रंगभूमीवर आले आहे.

आचार्य अत्रे यांच्या या नाटकामध्ये भावी समाज जीवनाचे भेसूर चित्र रंगवले आहे. वीस–पंचवीस वर्षापूर्वी लिहिले गेलेलं हे नाटक, नाटयप्रयोग आणि नाटयलेखनाच्या आजच्या परिस्थितीच्या संदर्भात कालबाह्य वाटते. प्रयोग क्वचित कंटाळवाणा होतो. असे असूनही आचार्यांचे संवादलेखनातील कौशल्य, नाटय उभारणीतील कल्पकता, आणि समाजजीवनाच्या भवितव्याचा वेध घेणारी वैचारिक प्रगल्भता, याचे उत्कट दर्शन ' उद्याचा संसार 'मध्ये पहावयास मिळते.

प्रयोगाच्या यशाचे सर्वात मोठे मानकरी अर्थात डॉ. श्रीराम लागू. बॅरिस्टर विश्रामची महत्त्वपूर्ण भूमिका ते उत्कृष्टपणे साकार करतात. बुलंद आवाजाची निसर्गदत्त देणगी, संवादफेकीवरील प्रभुत्व आणि नाटयमाध्यमाचा सखोल अभ्यास, यामुळे डॉक्टर लागू यांचा विश्राम विलक्षण प्रभावी ठरतो. चेहऱ्यावरील भावदर्शनामध्ये मात्र डॉक्टर अपेक्षेपेक्षा कमी पडतात. दिग्दर्शक या नात्यानेही डॉक्टरांनी समाधानकारक कामगिरी बजावली आहे. ' उद्याचा संसार 'मध्ये बॅरिस्टर विश्राम प्रभावी रहाणारच. परंतु प्रयोग अगदीच एक खांबी तंबू होऊ नये याची दक्षता घेण्यात आली आहे. अन्य कलाकारांपैकी शांता जोग (करुणा) व लालन सारंग (शैला) यांनी आपल्या अभिनयकौशल्याची प्रचीती दिली आहे. डॉ. लागूंसारखा ताकदीचा कलावंत बरोबर असूनही शांताबाईंची करुणा कमी पडत असल्याचे जाणवत नाही यात त्यांचे यश साठवले आहे. कमलाकर टाकळकर (गौतम) यांनी निराशा केली आहे. कित्येक प्रसंगी पाठांतर चोख असल्याची खात्री प्रेक्षकांना ते पटवून देतात. आणि संवाद बोलण्याऐवजी धडा वाचल्याप्रमाणे बोलत सुटतात. बॅरिस्टर विश्राम याने वर्णन केल्याप्रमाणे खरोखरच त्यांचा चेहरा हॅम्लेटच्या बापाप्रमाणे दिसतो. चंदू डेग्वेकर (शेखर) यांनी मेहनत तर भरपूर घेतली आहे. पण ते पूर्ण समाधान देऊ शकत नाहीत. गाण्यांच्या बाबतीत तर त्यांनी निराशाच केली आहे. शेखरचे फक्त पहिले गाणे ठेवून उरलेली दोन्ही गाणी खुशाल काढून टाकावीत. मीना

सुखटणकर (नयना) आपल्या भूमिकेला न्याय देऊन जातात. भावदर्शनाचे त्यांचे कौशल्य उल्लेखनीय आहे.

नाटकाचा तिसरा अंक विशेष प्रभाव पाडून जातो. पहिला अंक ठीक व दुसरा अंक काहीसा कंटाळवाणा वाटतो. एकंदर प्रयोगाचा साकल्याने विचार केल्यास प्रयोग प्रभावी ठरतो.

निर्मितीची बाजू उत्कृष्ट आहे. नाटक जुने असले तरी विषय सामाजिक आणि आशय प्रचलित काळाशी मिळता जुळता असल्याने नेपथ्य, प्रकाशयोजना आदि बाबतीत आधुनिक तंत्राचा वापर करणे शक्य झाले आहे.

रघुवीर तळाशिलकरांचे नेपथ्य परिपूर्ण व नाटकाच्या गरजा पूर्ण करणारे असले तरी आवश्यकतेपेक्षा जास्त संपन्न वाटते. आतील भागाच्या दारास असलेल्या साखळ्या, दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी उभारलेला चक्राकार, गजांकित चौथरा, प्रवेशद्वारानजीकच्या भिंतीतून निर्माण केलेली सूचकता यांची विषयाशी जवळीक आहे. प्रवेशद्वाराच्या भिंतीकडे पहात असताना विहिरीच्या भिंतीचा भास निर्माण होतो. संकटाच्या खोल गर्तेत अडकलेल्या कुटुंबातील घटना या पार्श्वभूमीवर कल्पना चांगली वाटते.

चक्राकार–गजांकित चौथऱ्याचा उपयोग दिग्दर्शक श्रीराम लागू यांनी कौशल्याने करून घेतला आहे. या भागाला त्यांनी आरोपीच्या पिंजऱ्याचे स्वरूप दिले असून त्या दृष्टीने काम्पोझीशन्स बसवली आहेत. दुसऱ्या अंकात ते रंगभूमीच्या अगदी विरुद्ध बाजूकडून या भागाकडे येतात त्या वेळी मात्र मुद्दाम सेटचा फायदा उठवण्यासाठी ते चौथऱ्याकडे येतात असे जाणवते.

शेखरच्या गाण्यासाठी वेगळी प्रकाशयोजना करून गाण्यांना कथाप्रवाहापासून मुद्दाम अलगपणा दिला असावा असे वाटते.

आचार्य अत्रे यांच्या जुन्या नाटकांना पुन्हा रंगभूमीवर आणण्याचा हा उपक्रम स्वागतार्ह आहे. धंद्याचे गणित कितपत जमते यावर अन्य नाटकांचे पुनरुज्जीवन अवलंबून राहील.

# तुम हसी मैं जवाँ

## चित्रपट

कोचीनच्या नॅशनल हॉस्पिटलमधील रिसेप्शन काऊंटरसमोर डॉ. शर्मा व इतर काही मंडळी एक कट रचीत असतात. नुकत्याच जन्मलेल्या मोठ्या इस्टेटीच्या एका वारसाला वाचवायचे कसे हा त्यांच्यापुढे पेच असतो. वेगवेगळे पर्याय समोर येतात. पण ते व्यवहार्य वाटत नाहीत. मग त्या इस्टेटवाल्याचा बॅरिस्टर आणि डॉ. शर्मा यांच्या डोक्यात एक अतिशय सुरेख कल्पना येते. ते त्या मुलाला फळांच्या करंडीतून पळवून नेण्याची योजना आखतात. ही कामगिरी सोपवली जाते तुम हसीं मैं जवाँची नायिका अनुराधा हिच्यावर.

तर रिसेप्शन काउंटरवर जाहीर गुप्तपणे होणाऱ्या या बनावात या चित्रपटामधील सगळ्या घटनांचे बीज आहे. कोणी एक महाराज मरण्यापूर्वी आपली सारी इस्टेट जन्माला येऊ घातलेल्या नातवाच्या नावे करून जातो. महाराजांच्या पुतण्याला-रणजितसिंहाला ही सारी इस्टेट हवी असते. त्याला महाराजांचे कृत्य रुचत नाही आणि दुष्मनी सुरू होते. या रणजितसिंहापासून मुलाला वाचविण्यासाठीच हॉस्पिटलमधला तो बनाव असतो. आणि त्या खलप्रवृत्त माणसाला मुलाचा जन्म झाल्याचेही कळू नये म्हणून डॉ. शर्मा स्वतःच एक शक्कल लढवितात. ते त्या दिवशी प्रसूत झालेल्या बायकांमध्ये महाराजांच्या सुनेऐवजी – गायत्रीदेवीऐवजी – तिची धाकटी बहीण कुमारी अनुराधा हिचेच नाव घालतात !

तर अनुराधा शिताफीने फळांची करंडी घेऊन बाहेर पडते. पण रणजितसिंहाला शंका येते. तेव्हा त्याच्यापासून बचाव म्हणून ती एका फळवाल्याकडे आपली करंडी हळूच ठेवते व तसलीच करंडी गाडीत घेऊन जाते. रणजितसिंहाच्या शंकेचे निरसन होते. पण एक नवीन पेच निर्माण होतो. मध्ये रणजितसिंह–अनुराधा परस्परांना टोलवत असताना, ती मूळवाली फळकरंडी एका व्यापारी जहाजावरील अधिकारी सुनील बोटीवर घेऊन जातो.

तर एव्हाना ध्यानात आलेच असेल की ती अनुराधा म्हणजे चित्रपटाची नायिका हेमा मालिनी, तो महाराजांचा पुतण्या रणजितसिंह म्हणजे प्राण, तो जहाजावरील अधिकारी सुनील म्हणजे नायक धर्मेंद्र.

यानंतर सुनीलने बोटीवर नवजात अर्भक आणल्यामुळे व ते त्यानेच मांडीवर घेण्याचे ठरविल्याने निर्माण झालेला विनोदी गोंधळ, ते जहाज मुंबईला आल्यावर अनुराधेने मुलाचा व पर्यायाने सुनीलचा केलेला शोध, मुलाचे रहस्य कायम रहावे म्हणून अनुराधेने सुनीलकडे पत्करलेले गव्हर्नेसचे काम, त्यातून त्या दोघांमध्ये

उत्पन्न झालेली प्रेमभावना, दरम्यान रणजितसिंहाला मुलाचा शोध लागल्याने त्याने मुलाचा काटा काढण्यासाठी केलेल्या अनेक क्लृप्त्या वगैरे वगैरेतून घटना अनेक घडतात. शेवटी सुनील–रणजितसिंह यांची आमनेसामने मुलाखत व एका प्रचंड माळावर जीवघेणी मारामारी व रणजितसिंहाला झालेला पश्चात्ताप.

तर असा हा चित्रपट उलगडत जातो. बरेचसे विनोदी प्रसंग, नायक–खल-नायकांचे शह–काटशह, नायक–नायिकेचा प्रणय आणि याचे एकत्र मिश्रण करण्यासाठी जरूर त्या इतर घटना. त्यात सुसंबद्ध काहीच नाही. अनेक घटनांचा कोलाहल एवढेच या चित्रपटाचे स्वरूप आहे.

दिग्दर्शक भप्पी सोनी यांनी चित्रपटात रहस्य असूनही रहस्य ठेवलेले नाही. सुरुवातीपासूनच नायक पक्ष व खलनायक पक्ष स्पष्ट होतात, त्यांच्यातील वैमनस्य प्रकट होते व मग अगदी एकाद्या बालबोध कथेप्रमाणे चित्रपट पुढे जातो. या चित्रपटातील नायिका अनुराधा हिची वास्तवात गायत्रीदेवी ही बहीण नसते. ती सुनीलची बहीण असते व अनुराधेच्या वडिलांनी तिला हे जरासुद्धा कळू न देता तिचा जीवापाड प्रतिपाळ केलेला असतो. साधारणत: हिंदी चित्रपटात अशी रहस्ये असतातच व त्यांचा स्फोट शेवटी ऐन संकटकाळी होऊन त्या अरिष्टाचा निरास होत असतो. येथे रहस्य सुरुवातीलाच स्पष्ट करून टाकले. त्यामुळे अपेक्षित घटना अपेक्षेप्रमाणे घडल्याचे समाधानही चित्रपट देत नाही–आणि धक्का देण्याचे सामर्थ्य त्या घटनांमध्येही नाही.

यामुळे सर्वसामान्य हिंदी चित्रपटांपेक्षाही 'तुम हसीं मैं जवाँ' अधिकच बेढब वाटतो. चित्रपटातला रंजक भाग विनोदाचा. एका अर्भकाची देखभाल करण्याचे काम पुरुषमंडळींवर आल्याने या चित्रपटातला विनोद घडतो. विनोदी प्रसंगामधील राजेंद्रनाथचा अतिरेक सोडला तर हा भाग सुसह्य आहे. भप्पी सोनी यांनी आठ दहा वर्षांपूर्वी 'एक फूल चार काटे' नावाचे एक सुरेख विनोदी चित्र सादर केले होते. त्यानंतर नुकताच लागलेला 'ब्रह्मचारी' हाही चित्रपट सोनींचाच. याच्याशी तुलना करता 'तुम हसीं'––मध्ये धड हलकाफुलका निर्भेळ विनोद नाही की 'ब्रह्मचारी'-सारखा नेहमीचा हिंदी चित्रपटाचा साचा नाही. येथे झाली आहे ती दोन्ही गोष्टी साधण्यातील गल्लत, व दिग्दर्शकाच्या मनातील हा गोंधळ पडद्यावर फारच बिदारकपणे सादर होत असतो.

या चित्रपटातील विनोदी प्रसंग धर्मेंद्रने त्याच्या कुवतीच्या मानाने फारच चांगल्या तऱ्हेने निभावून नेले आहेत. हेमा मालिनीला चित्रपटात कामच अगदी जुजबी आहे. प्राण आपल्या नेहमीच्या सफाईने वावरतो.

चित्रपटाची बाकी अंगे बेताची, सर्वसाधारणच आहेत. शंकर–जयकिशन यांचे संगीत अगदी अलीकडच्या चित्रपटांतून नुकतेच ऐकल्यासारखे वाटते.

**– मुंबईकर**

पृष्ठ ९ वरून

म्हटले तर अयशस्वी. लोकसत्तेसारख्या प्रथम श्रेणीतल्या दैनिकाचे धुरीणत्व त्यांनी वर्षोन् वर्षं तडफेने केले; स्वतःच्या लेखनशैलीवर त्यांनी स्वतःची अशी गुणसंपन्न मुद्रा उमटविली; स्वतःचा असा लुब्ध वाचकवर्ग निर्माण केला. ही झाली जमेची बाजू. पण सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या मनाची कळी कोमेजली होती. हृदयविकाराच्या हल्ल्याने त्यांचे ताठ व्यक्तित्व जणू ढेपाळलेच. तेजीत असताना ते फारसे करून आकाशवाणीची पायरी कधी चढलेच नाहीत. अस्ताला जाण्याच्या अगोदर मात्र त्यांनी खेपा घातल्या. सर्वांशी प्रेमाने, मायेने बोलायला लागले. म्हणाले, 'मला आता विसरा. मी मागे-मागे पडत चाललो. आय हॅव बिकम् ए बॅकनंबर. आणि हे असं होणारच!' नाटककार म्हणून त्यांना तरवार मारायची होती. पण ते खड्ग त्यांना पेलले नाही. त्यांच्या नाटयकृतींची नभोनाटयरूपांतरे तरी आकाशवाणी-वरून सादर व्हावीत म्हणून त्यांच्या स्नेहीमंडळींनी खटपट केली. तिला थोडंफार यश आलं. पण अखेर ते अस्ताला चाललेल्या सूर्याचे कमजोर किरण होते. आणि ह्यात दुःख मानायचं कारण नाही. कारण महाजनी माणूस होते. अस्त-उदय त्यांना चुकलेला नव्हता. मुख्य म्हणजे त्यांनी तो नीट जाणला होता. समारंभाच्या अध्यक्षांना मात्र संपादकाच्या झिरझिरीत बुरख्याआडचा गांगरलेला माणूस दिसला नाही. सध्या देश संकटात आहे, लोकशाही संकटात आहे, विध्वंसनाचे संहारसत्र सुरू आहे, वगैरे सांगून लोकमान्यांचा वारसा चालवणारे एडीटर महाजनी आज हवे होते, अत्रेही हवे होते, ही रेकॉर्ड त्यांनी बाहेर पावसाने झिम्मड उडविलेली असतानाही उत्साहाने ऐकवली. ◻


## राधा - माधव

मुंबई मराठी साहित्य संघ आणि राजीवश्री प्रकाशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. भि. वेलणकरकृत 'राधा–माधव' ह्या कवन संग्रहाचा प्रकाशन सोहोळा रविवारी सकाळी साजरा झाला. श्री. वेलणकर हे संस्कृत साहित्यक्षेत्रात मोठे नाणावलेले पंडित आहेत. झाला वेदांत पारितोषिक तर त्यांनी मिळवलेच, पण इतर तज्ज्ञ स्वीकारतात तो संस्कृत महाकाव्याचे मराठी रूपांतर करण्याचा राज-मान्य मार्ग न चोखाळता, त्यांनी मराठीतील उत्तम साहित्याचा अनुवाद संस्कृतमध्ये प्रसिद्ध केला आहे. अण्णा किर्लोस्करांच्या 'सौभद्रा'चे त्यांनी 'संस्कृत सौभद्र' हे

भाषांतर केले. त्याच्यावर भाऊसाहेब खांडेकर आकृष्ट झाले आहेत. कवि यशवंतांच्या ' जयमंगला 'चेही त्यांनी समवृत्त संस्कृत रूपांतर प्रसिद्ध केले आहे. ही पुण्याई पाठीशी घेऊन त्यांनी आपला मोहोरा स्वतंत्र मराठी कवनलेखनाकडे प्रथमच वळवला आहे. त्याचे फळ म्हणजे ' राधा–माधव ' हा संग्रह.

ह्या कवनप्रपंचाकडे हौस म्हणूनच पाहिले पाहिजे. नव्या धर्तीच्या काव्य रचनेचे गोमटे वारे त्यांच्या अंगावरून वाहिलेले नसावे हे योगिनी जोगळेकरांनी समारंभात गाऊन दाखविलेल्या कवनावरून लक्षात आले. योगिनीबाईंनी वाचून दाखविलेली कविता, कवि कोण हे जाहीर केले नसते, तर शंभर हिरस्यांनी कै. मायदेवकवींच्या नावावर खपली असती ! ' राधा–माधव ' हे पौराणिक प्रतिक कवनकारांनी आजकालची संसारचित्रं शब्दांकित करण्यासाठी म्हणून वापरलं आहे. भक्तीत रूपांतरीत होणाऱ्या आदर्श आणि निरपेक्ष प्रीतीचं हे प्रतिक परिचारिका, नटी, नोकरी करणारी गृहिणी ह्यांच्या संसारातून त्यांनी विषादपूर्वक फिरवलेलं आहे. जणू ही कवनं म्हणजे एकांतातलीच भाषणं आहेत.

प्रमुख वक्ते प्रा. व दि. कुलकर्णी आणि गाठ सोडण्याचा विधी पार पाडणारे पुरोहित म्हणून प्रा. मं. वि. राजाध्यक्ष ह्यांची भाषणं विलक्षण कृत्रिम होती. ह्या कवनांची भलावण करता करता राजाध्यक्ष कुंटयांच्या ' राजा शिवाजी 'चा हवाला देण्याइतके मागे गेले. आणि तिथून पुन्हा सत्तर सालापर्यंतचा दमछाकीचा पल्ला गाठता गाठता केशवसूत, मर्ढेकर वगैरे सोईस्कर थांब्यांवर त्यांनी विश्रब्ध विरंगुळा घेतला. ह्या समारंभाचे वैशिष्टय म्हणजे कविता संग्रह असूनही बावीस गिऱ्हाईकांनी रांगेत नंबर लावून पदरमोड करून कवनसंग्रहाच्या प्रती खरेदी केल्या. जाता जाता एक गोष्ट सांगितली पाहिजे. वेलणकर हे टपाल खात्याचे वरिष्ठ अंमलदारही आहेत. साहित्यिकांनी पूर्ण दुर्लक्ष केलं, तरी ह्या सोहोळयात त्यांच्या आप्तेष्टांनी आणि टपालखात्याच्या संबंधितांनी उत्साहाने उपस्थिती लावून, शिष्ट साहित्यिकांची खोड परस्पर मोडली !



## दिल्ली दरबार....

पृष्ठ ६ वरून

असून संन्याल यांचा मध्यममार्ग मुजुमदारांना पसंत नाही ही गोष्ट पटनाईक यांची जी दैनंदिनी पोलिसांच्या हाती सापडली त्यावरून उघडकीला आली. प्रारंभी संन्याल मुजुमदारांना एवढे मानीत होते की, 'भारताचा माओ त्से तुंग' असा त्यावेळी ते मुजुमदारांचा गौरव करीत असत.

अर्थात येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. 'चेअरमन माओ हा आमचाही चेअरमन' अशी हा पक्ष घोषणा करीत असला तरी माओत्से तुंग किंवा हो चि मिन्ह यांच्या कार्यपद्धतीशी नक्षलवादी चळवळीचे फारसे साम्य नाही. शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांच्या मार्फत शहरांना वेढा घालण्याचे तंत्र माओ किंवा हो चि मिन्ह यानी अवलंबले होते. या उलट नक्षलवादी चळवळीचा सारा भार वैयक्तिक दहशतवादावर आहे. जमीनदारांचे खून करणे एवढे एकच उद्दिष्ट मनाशी बाळगून या पक्षाचे कार्यकर्ते ग्रामीण भागात हिंडत असतात. 'लिबरेशन' हे या पत्राचे मुखपत्र असून त्याच्या ताज्या अंकामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये ज्या शंभर जमीनदारांचे खून करण्यात आले त्यांची यादी देण्यात आलेली आहे.

पंधरा दिवसांपूर्वी कनू संन्याल यांना पकडण्यात पोलिसांना यश आले.

कनू संन्यालच्या अटकेमुळे नक्षलवादी चळवळीच्या व्याप्तीला काही काळ जरी आळा बसणे शक्य असले तरी नेत्यांच्या धरपकडीमुळे या विध्वंसक प्रवृत्तीची पाळेमुळे नाहीशी होणार नाहीत हे ध्यानात घेतले पाहिजे. कनू संन्याल यांना अटक झाल्याचे कळताच उत्तर कलकत्त्यातील वातावरण इतके चिघळले की तेथील दैनंदिन जीवन तर विस्कळीत झालेच परंतु प्रक्षुब्ध विद्यार्थीवर्गाने आगी लावण्याचे, लूटमारीचे आणि दगडफेकीचे असे काही तुफान निर्माण केले की गोळीबार केल्याशिवाय शांतता प्रस्थापित करणे पोलिसांना अशक्य झाले. म्हणजे या चळवळीचे आकर्षण केवळ भूमिहीन शेतकऱ्यांपुरतेच मर्यादित नाही. बेकार सुशिक्षित युवकही वैफल्यापोटी या चळवळीकडे आकृष्ट होतो. डाव्या साहसवादाशी मुकाबला करण्याची भाषा बोलणाऱ्या राज्यकर्त्यांनी या वस्तुस्थितीची दखल घेऊन त्यानुरूप उपाययोजना केली तरच कर्करोगाप्रमाणे भारताच्या शरीरात पसरत चाललेली ही निखालस राष्ट्रद्रोही प्रवृत्ती निपटून टाकणे शक्य होईल. केवळ कनू संन्यालांच्या अटकेने फारसे भागणारे नाही.

युवक–वर्गाच्या वैफल्याला छेद देणारा आर्थिक आणि सामाजिक कार्यक्रम कार्यवाहीत आणण्याची जिद्द, केवळ तात्कालीक सांधेजोडीच्या राजकारणात मग्न असलेल्या प्रधानमंत्री दाखवतील की नाही हा खरा प्रश्न आहे.

– सदाशिव पेठकर

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Bi-Weekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649

वसन्त पोतदार

# अग्निपुत्र

प्रसिद्धिकाल
१९७० : अखेर

या पुस्तकांची प्रसिद्धिपूर्व सवलत
योजना बंद झाली आहे.

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

प्रसिद्धिकाल
१९७१ : मध्य

राजहंस प्रकाशन